## बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे









बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक २७ | बुधवार,दि.०९ जून २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# १८ वर्षांवरील सर्वांना २१ जूनपासून मोफत लस



**नवी दिल्ली** : राज्यातल्या तरुणांच्या लसीकरणाची जबाबदारी पेलण्यात विविध राज्य सरकारांना आलेल्या अपयशानंतर आता केंद्र सरकारने या वर्गाचेही मोफत लसीकरण करण्याची घोषणा केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल ही घोषणा केली. येत्या आंतरराष्ट्रीय योग दिनापासून म्हणजेच २१ जूनपासून १८ वर्षांवरील सर्वांना केंद्र सरकारतर्फे मोफत लस दिली जाईल, असे त्यांनी देशाला संबोधित करताना जाहीर केले.

केंद्र सरकारने १६ जानेवारीपासून देशभरात लसीकरणाला सुरुवात केली. आरोग्य कर्मचारी, त्यानंतर ६० वर्षांवरील नागरिक, त्यापाठोपाठ सहव्याधी असलेले ४५ वर्षांवरील नागरिक, अशा विविध वर्गांचे लसीकरण होत असताना अनेक राज्यांनी, आपल्यालाही लसीकरणाचे अधिकार द्या. तरुणांचेही लसीकरण महत्त्वाचे आहे, अशी मागणी केली. त्यांचा आग्रह लक्षात घेता त्यांनाही लसीकरणाची जबाबदारी देण्यात आली; परंतु काही काळातच केंद्र सरकारनेच लस खरेदी करावी म्हणून राज्यांनी आग्रह धरला. अशा स्थितीत केंद्र सरकारने आता १८ वर्षांवरील सर्व नागरिकांचे लसीकरण, तेही मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे. २१ जूनपासून याची अंमलबजावणी सुरू होईल. एक आठवडा आधीच राज्यांना त्यांना किती लसी मिळणार हे कळवले जाईल. त्यामुळे त्याचे नियोजनही करणे राज्यांना सहज शक्य होईल, असेही पंतप्रधान म्हणाले.

## खासगी लसीकरणासाठी द्या फक्त १५० रुपये जादा

भारतात तयार होणाऱ्या लसींचे ७५ टक्के उत्पादन केंद्र सरकार खरेदी करेल. त्यातून हे मोफत लसीकरण करण्यात येईल. उरलेले २५ टक्के उत्पादन खासगी हॉस्पिटलना खरेदी करता येईल. ज्यांना पैसे देऊन लस घ्यायची आहे ते या हॉस्पिटलमधून लस घेऊ शकतील. त्यांना लसीच्या निर्धारित दरापेक्षा अधिकचे १५० रुपये सर्व्हिस चार्ज द्यावा लागेल, असेही मोदी यांनी स्पष्ट केले.

## १० ते १५ लसी होणार उपलब्ध

देशात सध्या दोन लसी उपलब्ध आहेत. याशिवाय आणखी सात लसी बाजारात उपलब्ध होण्याच्या स्थितीत आहेत. त्याव्यतिरिक्त आणखी तीन उत्पादकांकडून लसींची अंतिम चाचणी सुरू आहे. याशिवाय परदेशांतून लस खरेदी करण्याच्या वाटाघाटीही सुरूआहेत. लहान मुलांना लस देण्याची चाचणीही दोन कंपन्यांकडून येथे सुरु आहे. नाकात स्प्रे मारून लस घेण्याच्या प्रकारावरही प्रयोग सुरूआहेत. त्यामुळे देशातल्या जनतेने निर्धास्त राहवे, अशी ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी दिली.





## दिवाळीपर्यंत ८० कोटी जनतेला मोफत धान्य

कोरोनाच्या पहिल्या लाटेच्या वेळी केंद्र सरकारने लॉकडाऊन जाहीर केला होता. त्यावेळी केंद्राने प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेखाली ८० कोटी लोकांना दिवाळीपर्यत मोफत धान्य दिले होते. दुसऱ्या लाटेतही दोन महिन्यांसाठी या योजनेखाली मोफत धान्य देण्याचे आम्ही जाहीर केले होते.

# नवनीत राणांची "खासदार'की धोक्यात?; उच्च न्यायालयाकडून जात प्रमाणपत्र रद्द

**अमरावती**,:- युवा स्वाभीमानच्या नेत्या व अमरावतीच्या खासदार नवनीत कौर राणा यांच्या अडचणी वाढल्या आहेत. उच्च न्यायालयाने नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र रद्द केले आहे. यासह खासदार राणा यांना कोर्टाकडून २ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता नवनीत राणांची खासदारकीही धोक्यात आली असल्याचे बोलले जात आहे. या सर्व प्रकरणनंतर आता नवीन राणांनी प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकार परिषद घेत त्यांनी शिवसेनेवर गंभीर आरोपही केले आहेत.



नवनीत राणा यावेळी बोलताना म्हणाल्या की, मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला आदेश मी अद्याप वाचलेला नाही. मात्र यामध्ये पॉलिटिकल खिचडी शिजली असल्याचे त्या म्हणाल्या. कारण, अचानक कोर्टाचा असा निर्णय येणे म्हणजे कुठेतरी राजकीय खिचडी शिजली हे नक्की असेही नवनीत राणा म्हणाल्या आहेत.

पुढे बोलताना राणा म्हणाल्या की, गेली ९ वर्षे मी हा लढा देतेय. या प्रकरणात कोणी राजकारण केले हे मला सांगण्याची गरज नाही. मात्र माझा आणि शिवसेनाचा हा वाद सर्वश्रुत असल्याचेही नवनीत राणा म्हणाल्या. दरम्यान, कोर्टाच्या या निर्णयानंतर न्याय मागण्यासाठी मी सवोच्च न्यायालयात जाईन. मला न्यायावर विश्वास असल्याचेही नवनीत राणा म्हणाल्या.

### कोर्टाच्या निर्णयाचा आदर करते

कोर्टाच्या निर्णयाविषयी बोलताना नवनीत राणा म्हणाल्या की, मी कोर्टाच्या निर्णयाचा आदर करते. अद्याप मी न्यायालयाचा आदेश वाचलेला नाही. गेल्या आठ वर्षांपासून आम्ही यावरुन भांडत आहोत. महिलेला अनेक परिश्रम करावे लागतात आणि परिश्रम मी गेल्या ९ वर्षांपासून केले आहेत. न्यायालयाने मला ६ आठवड्यांचा वेळ दिलेला आहे. कोणत्या कारणामुळे प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेय याचा मी अभ्यास करेल. मला न्यायावर आणि माझ्या कामावर विश्वास असल्याचेही नवनीत राणा म्हणाल्या.

### नेमके प्रकरण काय?

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांनी शिवसेनेच्या जेष्ठ नेत्यांपैकी एक असलेल्या आनंदराव अडसूळ यांचा पराभव केला होता. यानंतर आनंदराव अडसूळ यांनी खासदार नवनीत राणा यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेत याचिका दाखल केली होती.

उच्च न्यायालयाने हा घटनेवरील घोटाळा आहे, असे मत नोंदवून सदर जात प्रमाणपत्र रद्द करुन नवनीत राणा यांना २ लाखाचा दंड ठोठावला आहे. तसेच हे खोटे जात प्रमाणपत्र ६ आठवड्याच्या आत शासनाला जमा करण्याचे आदेशही दिले आहेत. मुंबई हायकोर्टाच्या न्यायमूर्ती धनुका आणि न्यायमूर्ती बिश्त यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला आहे.आनंदराव अडसुळ यांच्या वतीने ॲड. सी. एम. कोरडे, ॲड. प्रमोद पाटील व ॲड. सचिन थोरात यांनी बाजू मांडली.

# ठाकरेंची मोदींकडे आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा शिथील करण्याची मागणी



**नवी दिल्ली** - राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मराठा आरक्षणासंदर्भात नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर महाराष्ट्र सदनात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मोदींसोबत व्यवस्थित चर्चा झाली असून त्यांनी सर्व विषय गांभीर्याने ऐकून घेतले आहेत. राज्याचे जे विषय मांडले आहेत त्याची माहिती घेऊ, असे आश्वासन त्यांनी दिल्याचे सांगितले आहे. आम्ही जे विषय मांडले आहेत ते पंतप्रधान सकारात्मक पद्धतीने सोडवतील, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अशोक चव्हाणही यावेळी उपस्थित होते.

पंतप्रधानांसमोर राज्यातील संवेदनशील विषय उद्धव ठाकरे यांनी मांडले असल्याची माहिती दिली. मराठा आरक्षण, इतर मागासवर्ग आरक्षण, मागासवर्गीय बढतीमधील आरक्षण, मेट्रो कारशेडसाठी कांजूरमार्गच्या जागेचा विषय, जीएसटीचा परतावा, शेतकऱ्यांच्या आयुष्याशी निगडीत प्रश्न, पीक विमा, चौदाव्या वित्त आयोगातील थकीत निधी, मराठा भाषेला अभिजात दर्जा आणि वादळग्रस्तांना मदतीचे निकष याबद्दल मोदींशी चर्चा झाल्याचे उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मराठा आरक्षणातील सवोच्च न्यायालयाच्या निर्णयातील महत्वाचे मुद्दे मोदींच्या निदर्शनास आणून दिल्याचे अशोक चव्हाण यांनी यावेळी सांगितले. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा शिथील करावी, अन्यथा राज्यांना अधिकार देऊनही आरक्षणाचा मुद्दा मार्गी लागणार नाही, अशी मागणीही यावेळी त्यांनी केली. तसा युक्तिवाद सवोच्च न्यायालयात झाला पाहिजे, असे मतही यावेळी त्यांनी व्यक्त केले.

तुमच्याकडे अधिकार असताना निर्णय घ्यावा आणि मराठा समाजाला न्याय द्यावा अशी विनंती मोदींना करण्यात आल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. मराठा असो किंवा ओबीसी आरक्षण असो घटनादुरुस्ती किंवा कायदेशीर मार्ग असतील सकारात्मक भूमिका घ्यावी, असे सांगितल्याचे अशोक चव्हाण म्हणाले आहेत.

२४ हजार ३०६ कोटी जीसएटी भरपाई महाराष्ट्राला मिळणे बाकी आहे. कोरोनाचे संकट सर्वांवर असून आर्थिक दिलासा देण्यासाठी हे पैसे लवकर मिळाले तर फायदा होईल, असे अजित पवार यांनी यावेळी सांगितले. वादळाचा फटका बसल्यानंतर मदतीचे निकष बदलण्याची गरजही यावेळी मोदींकडे बोलून दाखवण्यात आली. २०१५ चे नियम आपण बदलण्याची गरज असल्याचे उद्धव ठाकरेंनी यावेळी सांगितल्याची माहिती अजित पवारांनी दिली. तसेच १४ व्या वित्त आयोगातील थकीत १ हजार ४४ कोटींचा निधी तात्काळ मिळावी, अशी मागणी केल्याचे अजित पवारांनी सांगितले.

दरम्यान यावेळी मोदींसमोर विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त १२ जागांचा मुद्दाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मांडला. सरकार बहुमतात आहे. कॅबिनेटने ठरावा केला आणि राज्यपालांना भेटलो. या १२ जागा जवळपास आठ महिन्यापासून रिक्त आहेत. नियमावलीत ज्याप्रमाणे व्यक्ती निवडताना अटी असतात, त्या सर्वांचा त्यात समावेश आहे. तर तो मुद्दाही आम्हीही मोदींकडे मांडला. त्यांनी यावर जे काही करण्याची गरज आहे, त्यासंबंधी निर्णय घेतो असे सांगितले असल्याची माहिती अजित पवारांनी दिली. आम्ही देखील देखील अनेकदा १८ ते ४४ वयोगटातील महाराष्ट्रात सहा कोटी लोकसंख्या असून त्यासाठी १२ कोटी डोस लागतील, असे सांगितले होते. आम्ही त्यासाठी निधी ठेवला होता. आम्ही सुरुवातही केली होती. पण पुरवठा व्यवस्थित होत नव्हता. पंतप्रधानांनी सर्व जबाबदारी घेतली असून आम्ही त्यांचे आभार मानतो. आता अडथळे येणार नाहीत अशी अपेक्षा, असल्याचे उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. सर्वांना लस मोफच मिळाली पाहिजे, हा त्यांचा अधिकार असल्याचेही ते म्हणाले आहेत.

# दोन लाखांहून अधिक शासकीय पदे रिक्त

**पुणे** : राज्य शासकीय कार्यालये आणि जिल्हा परिषदातील अधिकारी, कमचाऱ्यांची मिळून २ लाखांहून अधिक पदे रिक्त असल्याचे वास्तव उघड झाले आहे. रिक्त असलेल्या पदांपैकी १ लाख ४१ हजार ३२९ पदे सरळ सेवेने, तर ५८ हजार ८६४ पदे पदोन्नतीने भरायची आहेत. या रिक्त पदांसाठीची भरती प्रक्रिया कधी होणार याची राज्यभरातील स्पर्धा परीक्षा उमेदवारांना प्रतीक्षा आहे.

गेल्या काही वर्षांपासून राज्यातील रिक्त पदांचा आकडा वाढत असूनही राज्य शासनाकडून ही पदे भरण्यात आलेली नाहीत. या पार्श्वभूमीवर सुरेश गज्जलवार यांनी माहिती अधिकारात वर्ग एक ते वर्ग चारच्या रिक्त पदांचा तपशील राज्य शासनाकडे मागितला होता. सामान्य प्रशासन विभागाने प्रशासकीय विभागांकडून माहिती संकलित करून त्या अर्जाला दिलेल्या उत्तरातून ३१ डिसेंबर २०१९ अखेर राज्य शासकीय कार्यालये आणि जिल्हा परिषदांमध्ये २ लाखांहून अधिक पदे रिक्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र काही विभागांकडून माहिती उपलब्ध न झाल्याने त्या विभागातील रिक्त पदांचा समावेश आकडेवारीत नाही.

राज्य शासकीय कार्यालये आणि जिल्हा परिषदांमध्ये मिळून १० लाख ९९ हजार १०४ मंजूर पदे आहेत. त्यातील ७ लाख ८० हजार ५२३ पदे सरळसेवेची, ३ लाख १८ हजार ५८१ पदे पदोन्नतीची आहेत. त्यापैकी ८ लाख ९८ हजार ९११ पदे भरलेली आहेत. तर २ लाख १९३ पदे अद्याप रिक्त आहेत. त्या पैकी १ लाख ४१ हजार ३२९ पदे सरळसेवेने, तर ५८ हजार ८६४ पदे पदोन्नतीने भरायची असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. एकूण रिक्त पदांपैकी राज्य शासकीय कार्यालयांची रिक्त पदे १ लाख ५३ हजार २३१, जिल्हा परिषदांची रिक्त पदे ६४ हजार ९६२ आहेत.



### शासकीय कार्यालये, जिल्हा परिषद मिळून रिक्त पदांचा तपशील

अ वर्ग – १० हजार ५४५
ब वर्ग – २० हजार ९९९
क वर्ग–१ लाख २७ हजार ७०५
ड वर्ग – ४० हजार ९४४

### गृह विभागात सर्वाधिक रिक्त पदे

सर्वाधिक रिक्त पदे असलेल्या विभागांमध्ये गृह विभाग आघाडीवर आहे. गृह विभागातील २४ हजार ५८१, सार्वजनिक आरोग्य विभागातील २० हजार ५४४, जलसंपदा विभागातील २० हजार ८७३ पदे रिक्त असल्याचे दिसून येत आहे.

### पदे रिक्त असताना कंत्राटी भरती

राज्य शासकीय कार्यालये आणि जिल्हा परिषदांची मिळून लाखो पदे रिक्त असताना राज्य शासनाकडून कंत्राटी भरती करून तात्पुरती मलमपट्टी केली जात आहे. मात्र, रिक्त पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फेच (एमपीएससी) भरती प्रक्रिया राबवण्याची मागणी सातत्याने केली जात आहे.

> राज्य शासनाने डिसेंबर २०१९ अखेरच्या रिक्त पदांची माहिती दिली आहे. त्यामुळे त्या पुढील दीड वर्षांत आणखी काही पदे रिक्त झाली असतील. महापरीक्षा संकेत स्थळाद्वारे ३५ हजार पदांची भरती प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे रिक्त पदांची आकडेवारी तीन लाखांच्या घरात जाते. एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असूनही शासन भरती प्रक्रिया राबवत नसल्याने प्रशासनावर ताण येतो, त्याशिवाय स्पर्धा परीक्षांच्या उमेदवारांना संधी मिळत नाही. कंत्राटी पद्धतीने भरली जाणारी पदे ठरावीक काळापुरती असल्याने ती पदेही रिक्त होतात. त्यामुळे रिक्त पदांवर शासनाने केवळ एमपीएससीद्वारेच भरती प्रक्रिया करावी.
>
> – सुरेश गज्जलवार, माहिती अधिकार कार्यकर्ते

## १३ नवीन कोरोना रुग्ण

**गोंदिया,**: शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून ०८ रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवे १३कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले.४१ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांनी औषधोपचारातून कोरोनावर मात केल्याने त्यांना आज सुट्टी देण्यात आली.जिल्ह्यात आजपर्यंत २ लाख ७७ हजार १९६ लोकांचे लसीकरण करण्यात आले आहे.तर म्युकरसियसिसचे ३१ रुग्ण जिल्ह्यात आहेत.

आजपर्यंत ४०,९६० रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. ३९,९५२ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या ३०५ आहे.२७१ क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ६९३ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९७.४७ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.६१ टक्के आहे

# शाळा अधिकृत करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे काय

**तिरोडा** : अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी शुक्रवारी रब्बी हंगामातील धान खरेदी करण्यासाठी जिल्हा पहिल्या टप्प्यात ६० शाळा अधिग्रहीत करण्याचे आदेश काढले. मात्र कुठलेही राष्ट्रीय संकट नसताना शासकीय आणि खासगी शाळा अधिग्रहित करण्याचे अधिकार आहेत? असा सवाल माजी आ. दिलीप बन्सोड यांनी केला आहे.



जिल्हा परिषद शाळांचे सत्र २६ जूनपासून सुरुवात होणार. त्यातच रब्बी हंगामातील धान खरेदी सुरुच राहणार असल्याने विद्यार्थी कुठे बसणार किंवा कायमच्या शाळा बंद करण्याचा शासनाचा आदेश आहे काय? असा सवालदेखील बन्सोड यांनी उपस्थित केला आहे. शाळा देण्यासंदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांना आरटीई अंतर्गत अधिकारच नाही.

स्थानिक स्तरावर असलेल्या शालेय व्यवस्थापन समित्यांना तो अधिकार आहे. मात्र त्यांनासुध्दा विश्वासात न घेता हा निर्णय घेण्यात आला. शाळा इमारती देणे किंवा त्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली काय? नाही मग शाळा इमारती कशा मिळणार, अन्य विभागाच्या इमारती अधिग्रहण केल्यानंतर त्या त्या विभाग प्रमुखाच्या परवानगी मिळाली नाही व ते देणार किंवा नाही हे सुध्दा निश्चित नाही.

जिल्ह्यावर नैसर्गिक आपत्ती आलेली नाही किंवा नदीच्या पुरामुळे लोकांची घरे पडली नाहीत. वादळामुळे लोक बेघर झाले नाहीत, किंवा कोविडची परिस्थिती गंभीर झालेली नाही. अशाच आपत्कालीन परिस्थितीमध्ये फक्त शाळा, शासकीय इमारती, किंवा खासगी गोडावून, लॉन वगैरे अधिग्रहीत केल्या जाऊ शकतात. तेव्हा जिल्ह्यात अशी गंभीर परिस्थिती नाही.

खरीप हंगामाचे धान उचल न करणे म्हणजे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे व जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या बेजबाबदारपणाचा कळस आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाला शेतकऱ्यांचा रब्बी धान खरेदी करायचा असेल तर ही सर्व सोंग करण्यापेक्षा शासकीय शाळा घेण्यापेक्षा अनेक लॉन व सभागृह तालुका व गाव पातळीवर आहेत. त्यांना अधिग्रहीत करा.

## कृषी उत्पन्न बाजार समितीचे गोदाम अधिग्रहित करा

प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे यार्ड आहेत ते अधिग्रहीत करा कारण शासकीय आधारभूत किमती धान खरेदीचा शेष बाजार समित्यांना जातो. तेव्हा बाजार समित्यांचे यार्ड का अधिग्रहीत केले जात नाही असा सवालसुध्दा बन्सोड यांनी उपस्थित केला आहे. शासनाच्या खाली असलेल्या निवासी इमारती, कार्यालये अधिग्रहीत करावे, अशी मागणी बन्सोड यांनी केली आहे.

## धानाची उचल केव्हा करणार

सहा महिन्यांचा कालावधी लोटूनही मागील खरीप हंगामातील धानाची उचल करण्यात आली नाही. मग रब्बी हंगामासाठी शाळांचा धान खरेदीसाठी गोदाम म्हणून उपयोग केला जात आहे. शाळांमध्ये ठेवलेल्या धानाची किती महिन्यात उचल करण्यात येणार याची हमीपत्र जिल्हा प्रशासन शाळांना लिहून देणार काय? यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याला जबाबदार कोण राहणार असा सवाल बन्सोड यांनी केला आहे.

# भाजपने देशाचे वाटोळे केले-नाना पटोले



**गोंदिया** : जनतेशी खोटे बोलून केंद्रात सत्तेवर आलेल्या भाजप सरकारमुळे देशाचे वाटोळे झाले आहे. मागील सात वर्षांपासून देशाच्या विकासाला सुध्दा उतरती कळा लागली आहे. भाजप सरकारने देशाला चिनचे वाढते वर्चस्व, कोरोनामुळे वाढलेले मृत्यूचे प्रमाण आणि त्यामुळे जळणाऱ्या चिता आणि यातून आलेल्या संकटामुळे देशवासीयांची वाढविली चिंता असे तीन मचिफ देशाला दिल्याची टिका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी (दि.६) येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले रविवारी गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी स्थानिक शहीद भोला भवन येथे पत्रकारांशी संवाद साधला. तसेच गोंदिया येथूनच त्यांनी महाराष्ट्राच्या दौऱ्याची सुरुवात केली. पटोले म्हणाले, भाजप सरकारने राज्यातील महाविकास आघाडी सरकारला देखील त्यांचे काम करु देत नसून त्यात वांरवार अडथळे आणण्याचा प्रयत्न करीत आहे. ओबीसी, मागासवर्गीय, मराठा, धनगर आदी समाजामध्ये तेढ निर्माण करुन महाविकास आघाडी सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत आहे. मराठा समाजाचे आरक्षण रद्द होण्यास केंद्र सरकरचेच धोरण जबाबदार असल्याचा आरोप केला. त्यामुळे या सरकारचा खरा चेहरा जनतेपुढे आणण्यासाठी व तिसऱ्या लाटेच्या अनुषंगाने आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी मी महाराष्ट्राचा दौरा करीत असल्याचे पटोले यांनी सांगितले. देशावर कोरोनाचे संकट हे केंद्र सरकारच्या दुर्लक्षीत धोरणामुळेच आले. जागतिक आरोग्य संघटनेने देशात कोरोनाची दुसरी लाट येणार असा इशारा दिला होता. तसेच त्या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र याकडे दुर्लक्ष करुन जनतेला गाफिल ठेवण्याचे काम केले त्यामुळे देशात कोरोनाची दुसरी लाट आली.

हजारो लोक मृत्यूमुखी पडल्याचा आरोप पटोले यांनी केला. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे आरक्षण संपविण्याची भाषा करीत आहेत. तर पंतप्रधान हे संघाचे स्वंयसेवक आहेत मग आरक्षणाच्या बाजुने कोण आहेत आणि विरोधात कोण हे जनतेनेच ठरवावे. तसेच देशातील जनता भाजपला निश्चितच धडा शिकवेल, जी स्थिती भाजपची पश्चिम बंगालमध्ये तिच आता सर्वत्र होईल अशी टिका सुध्दा पटोले यांनी केली. पत्रकार परिषदेला कार्याध्यक्ष चंद्रकांत हांडोरे, आ. अभिजीत वंजारी, सहषराम कोरोटे, जिल्हाध्यक्ष नामदेव किरसान, जिल्हा कार्याध्यक्ष रत्नदीप दहीवले, अमर वऱ्हाडे उपस्थित होते.

## विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभेच्या निवडणुका सुध्दा स्वबळावर लढेल. त्या दृष्टीने पक्षाने तयारी सुध्दा केली आहे. या निवडणुका स्वबळावरच असा पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांचा देखील सूर आहे. त्यामुळेच या निवडणुका स्वबळावर लढल्या जातील असे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.

## एमबीबीएसच्या परीक्षा पुढे ढकला

सध्या सर्वत्र कोरोनाचा प्रादुर्भाव आहे अशात १० जूनला एमबीबीएसच्या परीक्षा जाहीर झाल्या आहेत. या परीक्षा ऑफलाईन घेण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची अडचण वाढली असून या परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. त्यामुळे यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांच्याशी चर्चा करुन या परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली आहे. तसेच कोरोना बाधित विद्यार्थ्यांना याच सत्रात काही दिवसांनी परीक्षा देण्याची मागणी केली असल्याचे पटोले यांनी सांगितले.

## संपादकीय

# महाआघाडी म्हणजे युती नव्हे

अराजक टाळण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी एका माध्यमाला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. अराजक म्हणजे काय? ते कोण निर्माण करीत आहे? हे त्यांनी एकदा स्पष्ट करून सांगायला हवे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे आपल्या भाषणातून, तर देशात अराजक निर्माण होईल, असा इशारा देत असत. विद्यमान शिवसेना पक्षप्रमुख हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत, जर कोणी अराजक निर्माण करीत असेल, तर त्याचा बंदोबस्त करणे हे त्यांचे काम आहे, पण आपल्याला राज्यकारभार झेपत नाही म्हणून राज्यात अराजक निर्माण होत असल्याची भीती जनतेला घालणे, हे राज्याच्या प्रमुखाला मुळीच शोभत नाही.

इच्छा प्रामाणिक असेल, तर युती इतकीतच आघाडी टिकेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. युतीच्या काळात देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेला आपल्या धाकात ठेवले होते. शिवसेनेला पाच वर्षांच्या कारकिर्दीत भाजपने संभाळताना लक्ष्मण रेषा ओलांडून दिली नव्हती. शिवसेना सत्तेत राहून पाच वर्षे फूस-फूस करीत होती, पण सेनेने सत्ता सोडली नाही. शिवसेनेचे मंत्री खिशात राजीनामे ठेऊनच फिरत आहेत, अशा वल्गना तेव्हा शिवसेनेने केल्या; पण सेनेच्या एकाही मंत्र्याने खिशात हात घालून तो कागद बाहेर काढला नव्हता. फडणवीस सरकार स्थापन झाल्यावर काही महिन्यांनी भाजपने सेनेला सरकारमध्ये सामावून घेतले; तेव्हाच शिवसेनेला भाजप फारशी किंमत देत नाही, हे स्पष्ट झाले होते. तरीही सत्तेसाठी हपापलेल्या शिवसेनेची पाच वर्षे विरोधी पक्षात बसण्याची मानसिकताही नव्हती. काहीही करा, कोणतीही खाती द्या, पण सरकारमध्ये घ्या, अशा घायकुतीला तेव्हा सेना आली होती. भाजपने शिवसेनेची कुवत ओळखून कमी महत्त्वाची खाती दिली. उपमुख्यमंत्रीपद किंवा गृहमंत्रीपद दिले नाहीच. तरीही शिवसेनेने २०१९ ची निवडणूक युती करून लढवली. विद्यमान महाआघाडी सरकारचे मुख्यमंत्रीपद शिवसेनेकडे असले, तरी वर्चस्व राष्ट्रवादी काँग्रेसचे आहे व काँग्रेस आपले अस्तित्व सतत दाखवून देत असते. युती वेगळी व महाआघाडी वेगळी. पण दोन्हीकडे शिवसेना केवळ सत्तेसाठी आहे. याच शिवसेना पक्षप्रमुखांनी शिवसेनेच्या दसरा मेळाव्याला फडणवीस यांना खूश करण्यासाठी "मैत्री काय असते ते दाखवूनच देतो,' असे म्हटले होते. नंतर पक्षाच्या मुंबईतील मेळाव्यात, "युतीमध्ये पंचवीस वर्षे शिवसेना सडली,' असे उद्गार काढले होते. एवढेच नव्हे, तर यापुढे शिवसेना कोणाशीही युती-आघाडी करणार नाही स्वबळावर लढेल, अशी गर्जना केली होती. नंतर काय घडले हे सर्व महाराष्ट्रातील जनतेने अनुभवले आहे. पुन्हा भाजपशी युती करून लोकसभा व विधानसभा लढवली आणि सर्वाधिक आमदारांची संख्या असलेल्या भाजपला सत्तेपासून दूर ठेवून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर सरकार स्थापन केले. ज्या काँग्रेस व राष्ट्रवादीच्या विरोधात वर्षानुवर्ष शिवसेनेने निवडणूक लढवली, ज्या काँग्रेस पक्षाची शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी नफरत केली, त्या पक्षाच्या मांडीला मांडी लावून त्यांचे पुत्र राज्याचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्रीपदाच्या मखरात बसले आहेत.

सरकार चांगले चालले आहे, असे रयतेने म्हटले पाहिजे; पण गेल्या दीड वर्षात या सरकारने जनतेला लॉकडाऊनमध्ये डांबून ठेवले आहे. लोक स्वतःच्या विवंचनेत आहेत. रोज कामावर जायचे कसे? रोजगार मिळवायचा कसा? घर कसे चालवायचे? लोकल ट्रेन सुरू कधी होणार? लस कधी मिळणार? या प्रश्नांनी जनतेला घेरले आहे. गेले आठ-दहा महिने, तर कोरोनाने आम जनतेला कमालीचे छळले. राज्यात कोरोनाने एक लाख बळी घेतले. औषध नाही, बेड नाही, ऑक्सिजन नाही, आयसीयू नाही, अशा समस्यांनी जनतेला ग्रासले होते. राज्याचे मुख्यमंत्री जनतेला दिलासा देण्यासाठी एकदाही बाहेर पडले नाहीत. कोणत्याही इस्पितळात तेथील उपचार व्यवस्था व आरोग्ययंत्रणा कशी आहे, हे बघायला गेले नाहीत. राज्याचे निवडक मंत्री जनतेला भेटत राहिले, पण त्यात शिवसेनेचे कोणी दिसले नाही. मुख्यमंत्री म्हणून राज्याचा दौरा कुठे व किती वेळा केला? कोणत्या भागांना भेटी दिल्या? हे एकदा त्यांनीच जाहीर करावे. मातोश्री व वर्षातून राज्यप्रमुख बाहेर पडत नाहीत, मुंबई तर त्यांना सोडवत नाही. तरीही ते म्हणतात, अराजक टाळण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.

सरकारमधील एक मंत्री शंभर कोटीच्या वसुली प्रकरणात पायउतार झाले, एका तरुणीने आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या पत्रावरून दुसऱ्या मंत्र्याला पदावरून जावे लागले. दोन मंत्री ईडीच्या रडारवर आहेतच. कोराना काळातील सरकारच्या भ्रष्टाचाराच्या कहाण्या सतत बाहेर येत आहेत. मग हे सरकार कसले प्रामाणिकपणे जनतेची सेवा करीत आहे? दहावी व बारावीच्या परीक्षा रद्द करणे हा निर्णय घेताना लक्षावधी विद्यार्थी व पालकांना या सरकारने ताण- तणावाखाली ठेवले. आता पुढील वर्षाच्या प्रवेशाची त्यांना चिंता लागून राहिली आहे. आपल्याला मिळणारे प्रमाणपत्र कोरोना वर्ष अशा शिक्क्यासह मिळणार का? अशी भीती त्यांना वाटत आहे. परीक्षा रद्द करणे आपल्याही आवडत नाही, असे मुख्यमंत्री म्हणतात, पण या संवेदनशील मुद्द्यावर त्यांनी दहावीच्या सोळा लाख व बारावीच्या चौदा लाख मुलांशी व त्यांच्या पालकांशी किती वेळा संवाद साधला? देशाच्या पंतप्रधानांनी आपल्या कामातून वेळ काढून देशाच्या वेगवेगळ्या भागातील बारावीच्या विद्यार्थ्यांशी हितगुज केले, मग मुख्यमंत्र्यांना हे का नाही जमले?

# लोकशाही शासन व्यवस्थेत राज्यभिषेकाचे स्मरण का...?



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वी सुद्धा भारतात अनेक राजघराणे होते, आणि ते स्वतःस 'राजे' म्हणून घेत होते. यात राजपूत आघाडीवर होते. महाराष्ट्रातही शिर्के, मोरे, निंबाळकर, जाधव, सुर्वे, दळवी असे घराणे होते. हे जरी स्वतःला राजे म्हणवून घेत असले तरी पण ते स्वतंत्रपणे राज्यकारभार करू शकत नव्हते. कारण ते आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही आणि मोगलशाही चे मांडलिकत्व स्विकारलेले राजे होते. हे सर्व घराणे या चारही शाह्यांची गुलामी करण्यातच धन्यता मानत होते. राजकीय गुलामगिरी बरोबर धामिक व सांस्कृतिक गुलामगिरीही निर्माण झालेली होती. राजकीय, सांस्कृतिक व धार्मिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी आणि बहुजन देखील स्वतःचे राज्य व राजा निमाण करू शकतात हा आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी शिवाजी महाराजांनी स्वतंत्र स्वराज्य स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता.

पुरोहितशाहीचा विरोध का? :- बादशाह अकबराच्या काळात कृष्णा भट शेष याने 'शूद्राचार शिरोमणी' नावाचा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथात तो म्हणतो की, "परशुरामाने संपूर्ण पृथ्वी एकवीस वेळा निःक्षत्रीय केली होती. आता हिंदू धर्मात राजतेजाचे व राजवंशाचे क्षत्रिय कोणीच उरले नाहीत." परंतु आम्ही या पुरोहितशाहीला साधा प्रश्न विचारत नाही की, 'एकदा पृथ्वी निःक्षत्रीय (क्षत्रिय नष्ट) केल्यानंतर ती पुन्हा पुन्हा का व कशी निःक्षत्रीय केल्या गेली? म आम्ही बहुजनांनी जणू बुद्धीच गहाण टाकलेली आहे अशा पद्धतीने विचार करतो.

काही सनातनी धर्ममार्तंड राज्यभिषेकाला विरोध करतांना 'नंदातम क्षत्रियकुलम' म्हणत असत. म्हणजे नंद राजाचा अंत झाला तेव्हाच क्षत्रिय कुळ नष्ट झाले. आता कोणी क्षत्रिय नाही. म्हणजे ब्राम्हणी व्यवस्थेनुसार शिवाजी महाराज हे क्षत्रिय नव्हते. हिंदू धर्मातील धर्म व्यवस्थेप्रमाणे राजा होण्याचा अधिकार फक्त ब्राम्हण व क्षत्रियांनाच होता. वरील मुद्द्यानुसार शिवाजी राजे हे क्षत्रिय ठरत नाही आणि ब्राम्हण असण्याचा विषयच नाही. वर्ण व्यवस्थेनुसार महाराज ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य सुद्धा नाही. म्हणजे राजे शुद्र वर्णात येतात. गंमत बघा, ब्राह्मण पुरोहितांना मुसलमान बादशहा चालत असे. यांनी शाह्यांना विरोध केल्याचे एकही उदाहरण नाही. उलट त्यांच्या दरबारात नौकर म्हणून मिरविण्यात धन्यता मानत असत. दुसऱ्या धर्मातील लोकांना सहकार्य तर; आपल्याच धर्मातील लोकांचा शूद्र म्हणून अपमान करणाऱ्यांच्या पायी लोटांगण घालण्यात धन्यता मानणारे आम्हा बहुजनांसारखे दुसरे गुलाम नाही. महाराष्ट्रातील सर्व ब्राम्हणांनी शिवाजी महाराज शूद्र होते. असे म्हणून राज्यभिषेकाला विरोध केल्यामुळे महाराजांनी काशीच्या ब्राम्हणाला मोठया प्रमाणात दान- दक्षिणेचे प्रलोभन दाखवून त्याकडून राज्यभिषेक करवून घेतला. शिवाजी राजे छत्रपती शिवाजी महाराज झालेत. धर्मव्यवस्थेप्रमाणे राज्यभिषेक झाला नसता तर तर महाराजांना धर्मानुसार सर्वव्यापक अधिकार प्राप्त झाले नसते. जसं लोकशाही शासन व्यवस्थेत एखाद्या पक्षाला बहुमत जरी प्राप्त झाले असेल तरी सुद्धा जेव्हा पर्यंत प्रधानमंत्री, मुख्यमंत्री किंवा मंत्री म्हणून शपथविधी होत नाही तेव्हा पर्यंत त्यांना राज्यकारभार करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. तोच निकष राज्यभिषेकाला लागू पडतो. राज्यभिषेकामुळे धर्मव्यवस्थेकडे असलेला न्यायाचा अधिकार राजाकडे जावून सामाजिक समता प्रस्थापित होणार होती, म्हणून या राज्यभिषेकास महाराष्ट्रातील पुरोहिवर्गाने एकमुखी विरोध केला होता.

राज्यभिषेकाचे फलित :- महाराजांच्या राज्यभिषेकानंतर मोगलशाही व चारही शाह्यांच्या जुलमाने त्रासलेल्या जनतेला बंड करण्याची प्रेरणा मिळाली. बुंदेलखंडातील छत्रसाल बुंदेला यांनी महाराजांची भेट घेतली व मोगलशाही विरुद्ध बंड करुन बुंदेलखंडात स्वतंत्र राज्य स्थापन केले. पुढे उत्तर व दक्षिण भारतातील अनेक सरदार व राजांनी बंड केलेत.

स्वराज्याचे दुसरे सेनापती नेताजी पालकर यांना राजकारणामुळे मुस्लिम धर्माचा स्वीकार करावा लागला होता. जेव्हा त्यांना मुस्लिम धर्म त्यागून हिंदू धर्मात यायचं होत, तेव्हा मएकदा धर्म सोडला की पुन्हा हिंदू धर्मात स्थान नाही. या नियमाला अनुसरून धर्म पंडितांनी विरोध केला होता. शिवाजी राजांचे राज्यभिषेक झाले असल्यामुळे त्यांनी या नियमाला कुचकामी ठरवून नेताजींना धर्मात प्रवेश दिला. शिवाजी महाराजांनी हा बदल स्वीकारल्यामुळेच आज काही लोकं घर वापसीचा नारा देवू शकले.

हिंदू राजाच्या मंत्रिमंडळात फक्त ब्राम्हण मंत्री असायचे. शिवाजी राजेंच्या राज्यभिषेकानंतर महाराजांनी हा नियम धाब्यावर बसवून अष्टप्रधान मंडळात ब्राम्हण मंर्त्याबरोबर शूद्र म्हणून उल्लेख केलेल्या दोन कायस्थ आणि एका मराठ्याचा समावेश करू शकले.

कोणत्याही पुरोहिताचे सहकार्य न घेता, शाक्तपंथीय पद्धतीने २४ सप्टेंबर १६७४ ला गोसाव्याच्या हस्ते दुसरा राज्यभिषेक करुन वैदिक राज्यभिषेक नाकारला. राज्यभिषेकांचे परिणाम भरपूर आहेत.

६ जुनलाच का :- ५ जून १६५९ ला औरंगजेबाचा सिंहसनारोहण झाला होता. आता मोगलाईचा अस्त होवून भारतीय स्वातंर्त्याचा सूर्य दक्षिणेकडे उगवलेला आहे. हा संकेत देण्यासाठी ५ जूनला मध्यरात्रीपासून राज्यभिषेकाला सुरुवात होवून ६ जूनला सकाळी स्वराज्याचा पहिला दरबार भरविला होता. औरंगजेबाला कळावं की भारतात स्वाभिमानी राज्याची स्थापना झाली आणि औरंजेबाच्या ढासळत्या डोलाऱ्याची त्याला कल्पना करून देण्यासाठी महाराजांनी जाणीवपूर्वक राज्यभिषेकाची तारीख ६ जून निवडली होती.

शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक म्हणजे भारतीय जनतेचा पहिला स्वातंर्त्य दिन होय. राज्यभिषेकदिन हा गणराज्य दिन आणि स्वातंत्र्य दिनाप्रमाणे राष्ट्रीय दिन म्हणून शासनाने घोषीत करायला हवे.

वर्तमानात देशाचा राज्यकारभार निवडणुकीच्या माध्यमातून लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून चालतो. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची शपथविधी झाल्याशिवाय त्यांना संवैधानिक अधिकार प्राप्त होत नाही. म्हणजे आधुनिक काळातील हा राज्यभिषेकच. परंतु राज्यभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी वापरलेले अधिकार आणि आताच्या लोकप्रतिनिधी मध्ये खूप फरक जाणवतो. तो असा....

स्वराज्याची बाह्य शत्रूपासून सुरक्षितता रहावी म्हणून शिस्तबद्ध लष्करी यंत्रणा उभारली होती. स्वराज्याच्या लष्कराचा शत्रूवर प्रचंड धाक होता. ज्यांनी स्वराज्यावर आक्रमणे केलीत त्यांची धूळधाण झाली. आज शेजारील मोठया राष्ट्र बरोबर पाकिस्तान, बांगलादेश आणि नेपाळ सारखे लहान देश डोळे वटारत आहेत.

संरक्षणा करिता लागणारे शस्त्र स्वराज्यातच तयार केली जात असत. म्हणजे शस्त्राच्या बाबतीत स्वराज्य आत्मनिर्भर होते. आता जे आत्मनिर्भरतेच्या बाता मारतात ते मात्र देशाच्या रक्षणासाठी दुसऱ्या देशाकडून तंत्रज्ञान मागवत आहेत.

स्वराज्यात स्त्रियांना सुरक्षितता वाटत होती. आम्ही निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीच्या काळात मात्र स्त्रीया असुरक्षित आहेत.

रयतेची गरिबी दूर करुन गरीब रयतेला श्रीमंत करण्याचे महाराजांचे धोरण होते. लोकशाहीत निवडून आल्यानंतर गंभीर पूर्वक राज्यकारभार करण्याची शपथ घेणाऱ्यांच्या काळात श्रीमंतांना विमानाची सेवा तर गरिबांवर हजारो किलो मीटरचा रणरणत्या उन्हात अनवाणी पायाने उपाशी पोटी प्रवास करण्याची वेळ सरकाने आणली आहे.

असे अनेक उदाहरणे आहेत की महाराजांनी स्वराज्याची स्थापना करुन त्याचे रूपांतर सुराज्यात केल्याचे. म्हणूनच चारशे वर्षानंतरही आम्हाला जन कल्याणाचा विचार करणाऱ्या राजेंचा राज्यभिषेकदिन लोकशाही शासन व्यवस्थेच्या काळात कायम मनामनात घर करुन आहे. लोकशाही पद्धतीने शासन करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना राजाचा राज्यभिषेक दिन शासकिय पत्रक काढून साजरे करावं लागतं आहे. फक्त अपेक्षा एकच सत्तधाऱ्यांनी महाराजांचे विचार आणि कार्य कृतीत आणावे. मित्रांनो, सध्या काल कोणी शपथ घेतली हे आम्हाला आज आठवत नाही आणि चारशे वर्षा आधी झालेल्या राज्यभिकातून आम्हाला प्रेरणा घ्यावी लागत आहे. म्हणून आजही शिवाजी महाराजांचा जयजयकार होतो.

**अनिल भुसारी, तुमसर जि. भंडारा ८९९९८४३९७८**

# पोलिस पाटिलांचे खा.पटेलांना निवेदन



**कोसमतोंडी:-** महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटनेच्या वतीने खा. प्रफुलभाई पटेल यांना निवेदन देऊन पोलीस पाटील यांचे सेवानिवृत्ती वय ६० वर्षे वरुन ६५ वर्षे करण्याची मागणी करण्यात आली.निवेदन देतेवेळी आमदार मनोहर चंद्रीकापूरे, माजी विधान परिषद सदस्य राजेंद्र जैन, राष्ट्रवादी काँग्रेस पाटीचे तालुकाध्यक्ष डॉ.अविनाश काशिवार हजर होते.

माहितीनुसार पोलीस पाटील हे पद मानधन तत्वावर मानसेवी पद म्हणून कार्यरत आहे. आपातकालिन व नैसर्गिक परिस्थितीत शासनास वेळोवेळी सहकार्य करीत असतात. सन २०२० पासून कोविड-१९ कोरोना संकटाचा सामना करित असतांना मदत कार्यामुळे आजपर्यत ४३ पोलीस पाटील मृत्यूमुखी पडले आहेत. मागिल चार वर्षांपासून नविन पोलीस पाटील यांची पदे भरण्यात आली नाही. आणि अजुन दोन वर्षे रिक्त जागा भरण्याची शक्यता नाही . त्यामुळे राज्यात ४० टक्के पोलीस पाटील यांची पदे रिक्त आहेत. एका पोलीस पाटीलाला अनेक गावांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

पोलीस पाटील हे पद मानधनी कर्मचारी असल्यामुळे अंगणवाडी सेविका प्रमाणे त्यांना वयाची अट लागू होत नाही. सध्या कोविड-१९ कोरोना संक्रमणाची परिस्थिती पाहता पोलीस पाटील पदाला मुदतवाढ देण्याची आवश्यकता आहे. विशेप बाब म्हणून या पदावर कार्यरत असलेल्या पोलीस पाटील यांचे सेवानिवृत्ती वय ६५ वर्षे करण्यात यावे.व कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या सर्व पोलीस पाटील यांच्या वारसांनाची नियुक्ती त्यांचे रिक्त झालेल्या जागी करण्यात यावी.आणि सर्व सेवानिवृत्त पोलीस पाटील यांना सेवानिवृत्तीची योजना लागू करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने वतीने करण्यात आली आहे.

सदर मागण्यांबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन खा.प्रफुलभाई पटेल यांनी संघटनेच्या शिष्टमंडळाला दिले. सदर निवेदन पोलीस पाटील संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष भृंगराज परशुरामकर, जिल्हा अध्यक्ष दिलीप मेश्राम, श्रीराम झिंगरे, नंदाबाई ठाकरे, उमेश वाढई, बोरकर पाटील यांनी खा.प्रफुलभाई पटेल यांना दिले आहे

# राज्यात १५ जून ते ३० सप्टेंबर दरम्यान वन महोत्सवाचे आयोजन ; सवलतीच्या दरात उपलब्ध होणार रोपे

**मुंबई :** – वृक्ष लागवड व संगोपन हा जनतेचा कार्यक्रम व्हावा तसेच जनतेला वनीकरणाचे महत्त्व पटवून देता यावे या हेतूने राज्यात १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत वन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही राज्यात या कालावधीत वन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून वनविभागातर्फे जनतेला सवलतीच्या दरात रोपे पुरवण्यात येणार आहेत.

**वन महोत्सवाचे स्वरूप**

राज्यात सुरु असलेला वृक्ष लागवडीचा कार्यक्रम यापुढेही अखंडपणे चालू राहावा म्हणून या कार्यक्रमांतर्गत खाजगी मालकीचे पडीत क्षेत्र आणि शेताच्या बांधावर, रेल्वे दुतर्फा ,कालवा दुतर्फा तसेच रस्ता दुतर्फा क्षेत्रात, सामूहिक पडीत क्षेत्र व गायरान क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. तसेच सर्वसामान्य शेतकरी व वृक्षप्रेमी यांना अल्पदरात रोपे उपलब्ध व्हावीत यासाठी वन महोत्सवाच्या कालावधीत सवलतीच्या दरात रोपांचा पुरवठा करण्याचा निर्णय वन विभागाने घेतला आहे.



**सवलतीच्या दरात रोपांचा पुरवठा**

सर्वसाधारण कालावधीत ९ महिन्यांचे रोप (लहान पिशवीतील रोप ) २१ रुपयांना तर १८ महिन्याचे रोप (मोठ्या पिशवीतील रोप) हे ७३ रुपयांना एक याप्रमाणे देण्यात येते. परंतु या वनमहोत्सवाच्या काळात ९ महिन्यांचे रोप केवळ १० रुपयांना तर १८ महिन्यांचे मोठ्या पिशवीतील रोप ४० रुपयांना एक याप्रमाणे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येईल.

**मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविण्याचे आवाहन**

राज्यात पावसाळ्यात १५ जून ते ३० सप्टेंबर या काळात वृक्ष लागवड करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा व आस्थापना तसेच निमशासकीय यंत्रणा व लोकांचा मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड कार्यक्रमात सहभाग घेण्यात येणार आहे. ज्या शासकीय यंत्रणांना वृक्ष लागवड करावयाची आहे अशा यंत्रणांना रोपनिर्मितीसाठी कोणत्याही प्रकारची तरतूद नसल्यास त्यांना रोपांचा मोफत पुरवठा करण्यात येईल. यासाठी त्यांनी लागणाऱ्या रोपांची आगाऊ मागणी, नजिकचे उपवनसंरक्षक किंवा विभागीय वन अधिकारी,सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडे पत्राद्वारे करावी. या योजनेचा लाभ सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी, निसर्गप्रेमी यांनी घेऊन वनेत्तर क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात हरित महाराष्ट्र घडविण्यासाठी आपले योगदान द्यावे असे आवाहन वन विभागातर्फे करण्यात आले आहे.

# भंडारा जिल्ह्याचा दैनिक पॉझिटिव्हीटी दर ०.५४

भंडारा- कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत म्हणजे मार्च एप्रिल महिन्यात ५० टक्क्यांवर असलेला जिल्ह्याचा कोरोना पॉझिटिव्हीटी दर आज ०.५४ टक्क्यांवर आला आहे. विशेष म्हणजे आजच्या चाचण्याही मोठ्या प्रमाणात आहेत. आज १६७९ व्यक्तींच्या कोविड चाचण्या केल्या असून त्यात केवळ ०९ व्यक्ती पॉझिटिव्ह आढळून आल्या आहेत.कोरोना आजारातून बरे होणाऱ्या रुग्णांचे प्रमाणही झपाट्याने वाढत असून आज रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.१३ टक्क्यांवर पोहचले आहे. आज ९८ रुग्ण बरे होऊन घरी गेले असून आतापर्यंत ५७ हजार ५२१ रुग्ण बरे झाले आहेत. १८ एप्रिल रोजी सर्वोच्च १२ हजार ८४७ क्रियाशील रुग्ण होते. जवळपास ५० दिवसानंतर जिल्ह्यात आता केवळ ६४५ क्रियाशील रुग्ण आहेत. जिल्ह्यातील सक्रीय रुग्णांची टक्केवारी फक्त ०१.०९ इतकी खाली आली आहे. एक जून ते आठ जून दरम्यान कोरोनाचा केवळ एक मृत्यू असून जिल्ह्याचा मृत्यू दर ०१.७८ टक्के एवढा आहे.जिल्ह्यात आज ९८ रुग्ण बरे होऊन घरी गेले असून बरे झालेल्या रुग्णांची संख्या ५७५२१ झाली असून आज ०९ नवे कोरोना बाधित रुग्ण आढळून आले आहेत. पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या ५९२२१ झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.१३ टक्के आहे.आज १६७९ व्यक्तींच्या घशातील स्त्रावाचे नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी ०९ व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्या आहेत. आतापर्यंत ०३ लाख ९७ हजार ३० व्यकींच्या घशातील स्त्रावाची

# पर्यावरणप्रेमींनी राबविला नवेगावबांध तलावात स्वच्छता अभियान



**अर्जुनी-मोरगाव :** नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र गोंदिया आणि प्रकृती नेचर फाऊंडेशन अर्जुनी-मोरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने नवेगावबांध तलाव स्वछता मोहिमेंतर्गत प्लास्टीक निर्मूलन अभियान राबविण्यात आले.

नवेगावबांध येथे लाखोंच्या संख्येने पर्यटक पर्यटनासाठी येतात. यामुळे तलाव परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक आणि प्लास्टिकजन्य कचरा परिसरात पर्यटक फेकून देतात. प्लास्टिकमुळे तलावातील पाणी दूषित होऊन जैवविविधतेसह तलावातील जलचर प्राण्यांना धोका निर्माण होतो. उद्भवणारा धोका टाळण्यासाठी प्रकृती नेचर फाऊंडेशनने पुढाकार घेत नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प कार्यालयाच्या सहकार्याने तलावात संपूर्ण स्वच्छता मोहीम राबविली. नवेगावबांधच्या स्वागत कक्षापासून पुढे तलावाच्या काठापर्यंत परिसरात पडलेले प्लास्टीक. जमा झालेल्या कच?याची वनविभागाच्यावतीने विल्हेवाट लावण्यात आली.

या वेळी NNTR चे ACF श्रीरामानुजम, Deputy Director पुनम पाटे, आरएफओ विजय धांडे, प्रकृती नेचर फाऊंडेशनचे डॉ.गोपाल पालीवाल, प्रा.अजय राऊत, डॉ.शरद मेश्राम, डॉ.आशिष कावळे व वनविभागाचे कर्मचारी, गाईड्स यांनी सहकार्य केले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई : एक कटू-वस्तुस्थिती

## स्थापना :-१९ नोव्हेंबर १९६०

या मराठी साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्थापनेपासून डिसेंबर २०१८ पर्यत एकूण ५८ वर्षात झाडीपट्टीतील गोंदिया व भंडारा जिल्ह?ातील एकाही साहित्यिकाची या मंडळावर सदस्य म्हणून निवड/नियुक्ती झाल्याचे आढळून येत नाही. (अपवादात्मक भूल-चूक क्षमस्व.) अखेर ५८ वर्षानंतर डिसेंबर-२०१८ मध्ये प्रथमच गोंदिया जिल्ह्यातील एका साहित्यीक व्यक्तीची तीन वर्षांकरिता सासंमं वर सदस्य म्हणून निवड/नियुक्ती करण्यात आली होती. परंतु दरम्यानची विधानसभा निवडणूक, सत्तापालट व नंतरचा कोरोनाकाळ लक्षात घेता या २०१८ च्या नियुक्त सासंमं ला कोणतेही ठोस कार्य करता आले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

२७ मे २०२१ ला सदरील सासंमं ची पुढील तीन वर्षांकरिता पुर्नरचना करण्यात आली असून त्यात पुन्हा झाडीपट्टीतील गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील साहित्यिकांना पूर्णतः वगळण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या शासन निर्णय क.सासंमं-२०२०/प्र.क.६/ भाषा-३, दि.२७ मे २०२१ नुसार पुनर्रचित सासंमं मध्ये अध्यक्षांसह एकूण तीस(३०) व्यक्तींची सदस्य म्हणून निवड/ नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रात आज मितीला ३६ जिल्हे असून दि.२७ मे २०२१ च्या वर नमूद शासन निर्णयाद्वारे पुनर्रचित सासंमं त निवड/नियुक्ती केलेल्या व्यक्तींचे जिल्हानिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे दिसून येत आहे.

**१) मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे - ०७,**
**२) पुणे - ०५,**
**३) कोल्हापूर -०२,**
**४) सांगली - ०१,**
**५) लातूर - ०१,**
**६) अहमदनगर - ०२,**
**७) सिंधुदुर्ग - ०१**
**८) नाशिक - ०१,**
**९) नांदेड - ०१,**
**१०) औरंगाबाद - ०१,**
**११) अकोला - ०१,**
**१२) नागपूर - ०१**

१३) जिल्ह्याचा उल्लेख न सापडलेले - ०६, (यात झाडीपट्टीतील कोणीच नसून हे कोल्हापूर, नांदेड, हिंगोली जिल्ह्यातील रहिवासी असावेत असा कयास आहे.)

११) मराठी साहित्य आणि संस्कृती मंडळावर महाराष्ट्रातील एकूण ३६ जिल्ह्यांपैकी फक्त १५ (?) जिल्ह्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले असून सदस्यत्वातून वगळण्यात आलेल्या जिल्ह्यांची संख्या-२१(?) आहे. ते जिल्हे असे - गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सातारा, सोलापूर, धुळे, जळगाव, नंदुरबार, जालना, बीड, परभणी, उस्मानाबाद, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ आणि वर्धा.

म्हणजेच या मराठी साहित्य आणि संस्कृती मंडळात झाडीपट्टीतील गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील साहित्यीकांना ५८ वर्षानंतर २०१८ मध्ये फक्त एक अपूरी संधी देऊन आता पुन्हा या जिल्ह्यातील साहित्यीकांना जाणीवपूर्वक वगळण्यात आले आहे, हे स्पष्ट होते.

यावरून प्रथमदर्शनी असा निष्कर्ष निघतो की, मुंबई, पुणे, पश्चिम महाराष्ट्र परिसर येथेच मराठी साहित्य आणि संस्कृतीचा कायम/ठोस "थांबा" असून नाशिक, नांदेड, औरंगाबाद, अकोला, नागपूर, लातूर, सिंधुदुर्ग येथे ह्या सासंमं च्या ट्रेन ला क्षणैक/विरळ "थांबा"च आहे. आणि झाडीपट्टीतील महान कवी/नाटककार भवभूतिच्या पावन रहिवासाने पुनित(?) झालेल्या गोंदिया व भंडारा या जिल्ह्यात तर या ट्रेन ला अजिबात (विरळ सुद्धा) थांबाच नाही/नसावा.

यासंदर्भात एक बाब विशेष प्रकर्षाने नमूद करण्यात येत आहे की, दि.२७ मे २०२१ च्या वर नमूद शासन निर्णयाद्वारे पुनर्रचित सासंमं च्या सर्व ३० ही सदस्यांच्या निवड/नियुक्तीबद्दल किंवा त्यांच्या योग्यतेबाबत व क्षमतेबाबत किंचितसा सुद्धा किंतु किंवा आक्षेप नाही आहे. उलट त्या सर्व मान्यवरांचे हार्दिक अभिनंदन व स्वागतच करण्यात येत आहे. परंतु मराठी साहित्य आणि संस्कृती सारख्या पवित्रतम क्षेत्रातही महाराष्ट्र शासन असा/अशी तरतमच नव्हे तर जाणीवपूर्वक भेदभाव/आपपरभाव/अवमान व अन्यायजनक वृत्ती बाळगून आहे, याचे मात्र एक सच्चा महाराष्ट्रीयन व मराठी माणूस म्हणून खूप खूप वैषम्य अवश्य आहे. यापुढे तरी महाराष्ट्र शासनाचे धुरीण याबाबत गंभीर दक्षता घेतील अशी भाबडी आशा बाळगून आहोत. ?

**आपले, झाडीपट्टीवासी महाराष्ट्रीयन, (मराठी, झाडीबोली, पोवारी बोली, गोंडी बोली चे साहित्यिक व अभ्यासक)**
**१) लखनसिंह कटरे, बोरकन्हार-४४१९०२ ता.आमगांव, जि.गोंदिया,**
**२) उषाकिरण आत्राम, धनेगांव/दर्रेकसा, ता.सालेकसा, जि.गोंदिया**
**३) मिलिंद रंगारी, मु.रिसामा, पो.आमगांव-४४१९०२, जि.गोंदिया.**
**४) पवनकुमार पाथोडे, मु.गांधीटोला, पो.सातगांव-४४१९०२, ता.सालेकसा, जि.गोंदिया.**
**५) देवेन्द्र चौधरी, सहकार नगर, तिरोडा, जि.गोंदिया.**
**६) हिरदीलाल ठाकरे, भजेपार, ता.आमगांव, जि.गोंदिया.**
**आणि समविचारी सर्व सहकारी.**

**लखनसिंह कटरे बोरकन्हार.**

# राजकीय पुढाऱ्यांचे अपयश व अधिकाऱ्यांचा मुजोरपणा

## ■आमगाव नगर परिषद ■आठ कोटीचे विकास कामे थांबली ■नवीन योजना निधी नाही

**आमगाव:** आमगाव ग्रामपंचायत ते नगरपरिषदचा निर्माण खडसर प्रवास सुरू आहे.न्यायालयीन प्रकरणात अनिर्णित निकाल असल्यामुळे मात्र नागरिक होरपळत आहेत. विकास कामे नाहीत. विकासकामांसाठी राजकीय नेते अपयशी ठरले तर अधिकारी मिजोरशाहीने कामे करीत आहेत याची झळ जनतेला पडत आहे.

राज्य शासनाने आमगाव ग्रामपंचायत ला सन २०१५ ला नगरपंचायत म्हणून नव्याने स्थापना केली तर तद्नंतर नागरिकांच्या मागणीप्रमाणे पुन्हा सन २आगष्ठ २०१७ ला न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शन प्रमाणे आठ गाव मिळून नगरपरिषदचा निर्माण केला. यातच राजकीय नेते आपसात श्रेय लाटण्यासाठी वर्चस्वाला समोर आले. आणि नागरिकांचा घात केला.




नगरपरिषदचा विषय न्यायप्रविष्ट आहे. वर्तमानात नगरपरिषद अद्यावत आहे. नगर परिषद अंतर्गत विविध योजनांच्या माध्यमातून विकास कामे, रोजगार, जमीन हक्क प्रकरण, रस्ते, गटार नाले विकास, नागरिकांना मिळणारे हक्काचे आवास योजनाचे लाभ या बाबतीत मात्र न्याय मिळवून देण्यासाठी कुठेच प्रयत्न करण्यात येत नाहीत . यामुळे सर्वच बाबतीत नागरिकांना न्याय मिळवून घेण्यासाठी सहा वर्षाचा वनवासात संपले.

आमगाव नगरपरिषद परिक्षेत्रातील नागरिकाना विकास कामे ग्राह्य असताना त्यांना विकासापासून जाणीवपूर्वक डावलण्यात येत आहे. नगर परिषद प्रशासनाने अनेक योजनांचे कृती आराखडा तयार करून जिल्हा नगर विकास विभाग व नगर विकास मंत्रालय कडे पाठपुरावा केला परंतु या प्रस्तावना मंजुरी मिळवण्यास स्थानिक जनप्रतिनिधी यांना यश मिळवता आले नाही, तर जिल्हाधिकारी नियंत्रणात असलेले जिल्हा नगर विकास विभाग मुजोरपणा बाळगून योजना प्रस्तावांना फाईलबंद करून ठेवले आहे.

**राजकीय पुढारी व प्रशासनाची उदासीनता नागरिकांच्या विश्वासाला तडा देत आहेत**

**नगर परिषद स्थापन करण्यासाठी ज्यांनी श्रेय लाटण्यासाठी पुढाकार घेतला, तर ज्यांनी नगर परिषद नको म्हणून लढा दिला असे पुढारी व खासदार आमदार आहेत कुठे ? नागरिक फक्त टॅक्स मोजत आहेत, पण विकास नाही. ही सर्व नागरिकांसाठी शोकांतिका आहे. जनतेनेच यासाठी संघर्ष पेटवायला हवा अशी प्रतिक्रिया माजी उपसरपंच रवी श्रीसागर यांनी वयक्त केली।**

आमगाव समाविष्ट आठ गावातील लोकसंख्या प्रमाणात मागणी असलेल्या विकास कामाची अत्यावश्यकता असताना अद्याप त्यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आले नाही. यात नागरिकांना मात्र अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

आर्थिक वर्ष २०१९-२० ला विशेष अनुदान योजनेतून आठ कोटींचे बांधकाम मंजूर करण्यात आले, परंतु आर्थिक वर्ष २०२०-२१ संपले असून सुद्धा सदर मंजूर कामांना निधी उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे मंजूर कामे ठप्प पडली आहे. नगर परिषद ला शासनाकडून विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी नवीन योजना आखली जाऊन त्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले. परंतु नवीन योजनाही मंजूर करण्यात येत नाही. त्यामुळे नागरिकांनी संयम सुटत चालला आहे.

# गोंदियातील १२३ इमारती धोकादायक

## मालमत्ताधारकांना नपने बजावले नोटीस

**गोंदिया:** पावसाळ्याच्या दिवसांत जिर्ण इमारती, व्यापारी संकुले पडून मोठी जिवीत व संपत्तीची हाणी होते. हे अलीकडे घडलेल्या अनेक घटनांतून दिसून आले आहे. भविष्यात अशा घटना घडू नये म्हणून स्थानिक नगर परिषदेने शहरातील जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण सुरू केले आहे. सर्वेक्षणात शहरातील १२३ इमारती धोकादायक असल्याचे निष्पन्न झाले आहे. संबंधित मालमत्ताधारकांना नपने नोटीस बजावली आहे.



पावसाळ्यात जीर्ण इमारतींना जास्त धोका राहतो. अशा जीर्ण इमारतींकडून कित्येकांचा जीव गेल्याच्या घटनाही घडल्या आहेत. येत्या काही दिवसांवर पावसाळा येऊन ठेपला आहे. पुर्व मोसमी पावसाला सुरवातही झाली आहे. मोसमी पाऊस कधीही हजेरी लावू शकतो. अशात जीर्ण इमारतींपासून त्यात वास्तव्य करणारे, परिसरात रहणारे किंवा ये-जा करणा?यांना धोका होऊ शकतो. गत काळात शहरातही अशा घटना घडल्या आहेत. मालमत्ता धारकांच्या हलगजीपणामुळे कुणाच्या जिवावर बेतू नये किंवा मालमत्तेची हानी होऊ नये यासाठी अशा जीर्ण मालमत्ता किंवा तीचा जीर्ण भाग पाडणे गरजेचे असते. यासाठी नगर परिषदेतर्फे शहरातील जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण सुरूझाले आहे. सर्व्हेक्षणात जीर्ण आढळलेल्या मालमत्ताधारकांना पालिकेने नोटीस बजावली आहे.

आतापर्यंत नगर परिषदेने अशा १२३ जीर्ण इमारतींची यादी तयार केली आहे. या सर्व मालमत्ताधारकांना नोटीस बजावण्याचे काम सुरू असल्याचे पालिकेच्या सुत्रांनी सांगीतले. जीर्ण इमारत पडून कुणालाही कोणताही धोका झाल्यास संबंधित मालमत्ताधारक जबाबदार राहतो. यासाठीच नगर परिषदेने आता नगर पालिका अधिनियमांतर्गत मालमत्ताधारकांना जबाबदार धरून नोटीस देण्यास सुरुवात केली आहे. शिवाय काही अनुचित प्रकार घडल्यास कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे नोटिसांत नमूद केले आहे.

# मुंडीकोटा-चांदोरी-भंबोडी,खळबंदा-कास्टोला-दवनीवाडा रस्ता बांधकाम; आ.रहांगडाले यांच्या हस्ते भूमिपूजन




**तिरोडा :** खळबंदा-कास्टोला हा रस्ता मागील अनेक वर्षापासून उखडला होता. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असून तशा नागरिकांच्या तक्रारीसुद्धा होत्या. ही बाब लक्षात घेऊन आमदार विजय रहांगडाले यांनी खळबंदा-कास्टोला-दवनीवाडा रस्ता बांधकामासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत ३१३.५३ लाखांचा निधी मंजूर करवून घेतला.

खळबंदा-कास्टोला रस्त्याचे बांधकाम मागील अनेक वर्षापासून प्रलंबित होते. यासाठी अनेक लोकप्रतीनिर्धीनी आश्वासने दिली, भूमिपूजनसुद्धा केले, परंतु काम सुरु झाले नाही. सदर रस्त्याबाबत परिसरातील जनतेने तिरोडा-गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांना माहिती दिली. याची तात्काळ दखल घेवून त्यांनी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत खळबंदा-कास्टोला-दवनीवाडा या २.६३ किमी रस्त्याकरिता ३१३.५३ लाखांचा निधी मंजूर करवून घेतला. तसेच या रस्ता बांधकामाचे भूमिपूजन आमदार रहांगडाले यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले असून कामाला सुरुवात होणार आहे.

तिरोडा तालुक्यातील मुंडीकोटा-भंबोडी-चांदोरी या १.१९८० कि.मी. रस्त्याच्या दर्जोन्नतीकरिता १५७.०१ लाखांचा निधी मंजूर करवून घेतला आहे.सदर कामामध्ये १.४९० किमीचे डांबरी रस्ते, ४४० कि.मी. गावअंतर्गत सिमेंट रस्ते, १०० मीटर सिमेंट नालीचा समावेश आहे. या रस्ता बांधकामाचे आमदार रहांगडाले यांच्या हस्ते नुकतेच भूमिपूजन करण्यात आले.यावेळी प्रामुख्याने भाजपा दवनीवाडा मंडळ अध्यक्ष धनेंद्र अटरे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय टेंभरे, जिल्हा सचिव अजाब रिनाईत, खळबंदा सरपंच सुकवंता तुरकर, विजय पिपरेवार, युवा मोर्चा अध्यक्ष प्रवीण बोपचे, मंडळ किसान मोर्चा अध्यक्ष नेहरुउपवंशी, माजी पं.स. सदस्य हितेंद्र लिल्हारे, भाजप मंडळ महामंत्री बंटी श्रीबांसरी, कैलाश गौतम, संघटक राजेश उरकुडे, उपसरपंच सुभाष साठवणे, महेंद्र कटरेया वेळी प्रामुख्याने भाजप जिल्हा महामंत्री मदन पटले, तालुकाध्यक्ष भाऊराव कठाणे, कृउबास उपसभापती विजय डिंकवार, माजी पं.स. सदस्य डॉ.बी.एस. रहांगडाले, सरपंच सुनिता अटराहे, कमलेश आतीलकर, शिवलाल परिहार, रवी मुटकुरे, महादेव कटनकर उपस्थित होते. उपस्थित होते.

# पोलिसांनी बेवारस मिळालेले पैसे केले परत

**गोंदिया:** शहर पोलिस ठाणे हद्दीतील मुर्री-चुटिया मार्गावर बेवारस मिळालेले १ लाख १४ हजार ९०० रुपयांची थैली पोलिसांनी थैली मालकाला परत केली. यासाठी मुरी येथील नागरिकांनीही पोलिसांची मदत केली.

शहर पोलिस पथक ५ जून रोजी गस्तीवर असताना मुरी-चुटिया मार्गावरील आशिर्वाद राईस मिलसमोर एका दुचाकी चालकाची पैशाची पिवशी पडली असू तर मुरी येथील सीमा सुरज दास यांच्याकडे असल्याची महिती मिळाली. त्याआधारे पोलिस पथकाने सीमा दास यांची भेट घेऊन चौकशी केली असता तिने रस्त्यावर पडलेली पैशाची पिवशी शेजारील व्यापाऱ्याजवळ ठेवल्याचे सांगितले. त्यावरुन पोलिसांनी व्यापाऱ्याकडे विचारणा केली असता त्याने पैशाची पिशवी पोलिसांच्या स्वाधीन केली. मोजणीदरम्यान पिशवीत १ लाख १४ हजार ९०० रुपये आढळून आले. दरम्यान, पोलिस परिसरातील सीसीटीव्ही कॅमेराच्या सहाय्याने तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून दुचाकीचालकाचा शोध घेत असताना गोरेगाव तालुक्यातील इसाटोला येथील चैनलाल नत्थुलाल बिसेन याने गोंदिया येथे किराणा सामना आणण्यासाठी जात असताना दुचाकीवरुन पैशाची पिशवी पडल्याचे सांगितले. तसेच पोलिसांना पैशाच्या वर्णनाची व रक्कमेची शहनिशा केल्यावर सदर पिशवी बिसेन यांची असल्याची खात्री पटल्याने ती त्यांना परत देण्यात आली.



# गोदामाची अडचण होणार दूर धानासाठी ६० शाळा अधिग्रहित

**गोंदिया:** रब्बी हंगामातील धान खरेदी त्वरित सुरु करण्यासाठी आता प्रशासनाने युद्धपातळीवर हालचाली सुरु केल्या आहेत. गुरुवार ३ जून रोजी अन्न व नागरी पुरवठा विभागाचे आदेश धडकताच शुक्रवार ४ जून रोजी जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी रब्बीतील धान खरेदीसाठी ६० शाळा अधिग्रहित करण्याचे आदेश काढले. त्यामुळे आता रब्बीतील धान खरेदीचा मार्ग मोकळा झाला आहे.



मागील खरीप हंगामातील धानाची गोदामातून अद्यापही उचल झालेली नाही. जवळपास ३० लाख क्विंटल धान गोदामांमध्ये तसेच पडून आहे. त्यामुळे यंदा रब्बीतील हंगामातील धान खरेदीला गोदामे उपलब्ध नसल्याने विलंब होत होता. खरीप हंगामाला सुरुवात झाली तरी रब्बीची धान खरेदी सुरु न झाल्याने बऱ्याच शेतकऱ्यांना अल्प दराने खासगी व्यापाऱ्यांना धानाची विक्री करावी लागत आहे. दरम्यान, शासकीय धान खरेदी सुरु न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप वाढत होता. गोदामांची अडचण दूर करण्यासाठी आश्रम शाळा, जिल्हा परिषद शाळा आणि शासकीय इमारतींचा वापर करण्याची मागणी पुढे केली जात होती. त्याचीच दखल घेत अन्न व नागरी पुरवठा विभागाने रब्बी धान खरेदीसाठी आश्रमशाळा, जि.प. शाळा आणि शासकीय इमारती अधिग्रहित करुन त्या जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाला उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी ४ जून रोजी रब्बीतील धान खरेदीसाठी ६० शाळा अधिग्रहित करण्याचे आदेश काढले आहे.

**पावसाने वाढविली चिंता**

जिल्ह्यात मागील दोन-तीन दिवसांपासून पाऊस सातत्याने हजेरी लावत आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील धानाची विक्री करण्यासाठी ते केंद्रावर नेताना शेतकऱ्यांना याचा फटका बसत आहे. तसेच पावसाळ्याला सुरुवात झाली असल्याने जोखीम पत्करुन केंद्रापर्यंत धान शेतकऱ्यांना न्यावे लागणार आहे.

# दिव्यांगांना त्वरित निधी द्या-आशिष बारेवार

**गोरेगाव:** तालुक्यातील दिव्यांगांना मागील दोन वर्षांपासून दिव्यांग निधी वाटप करण्यात आली नाही. त्यामुळे दिव्यांगांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. दिव्यांग निधी लवकरात लवकर त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे, अशी मागणी माजी नगराध्यक्ष आशीष बारेवार यांनी २८ मे रोजी नगरपंचायत मुख्याधिकारी हर्षला राणे यांच्याकडे पत्रांद्वारे केली आहे.



गोरेगाव नगरपंचायतमध्ये शहरातील ५८ दिव्यांग नागरिकांची नोंद आहे. या आधी बारेवार यांच्या शासन काळात लाभार्थ्यांना दरवर्षी दिव्यांग विकास निधीचे वाटप करण्यात येत होते. मात्र सद्यस्थितीत नगर पंचायत प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे दिव्यांग निधी २०१९-२० व २०२०-२१ या दोन वर्षांपासून प्रलंबित असून याकडे कोणाचेही लक्ष नाही. मागील वर्षांपासून कोरोना महामारीने थैमान घातले असून सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेकांसमोर उपसामारीची वेळ आली आहे. अनेकांचे रोजगार हिरावले, नोकरी गेली व हाताचे काम गेल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. दिव्यांग व्यक्तींना औषध घेण्यासाठी पैशांची गरज असते. मात्र मागील दोन वर्षांपासून त्यांना त्यांचा हक्काचा निधी मिळाला नसून त्यांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार यांनी नगर पंचायत प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे या दिव्यांगांना त्यांचे दिव्यांग विकास निधीचे पैसे देण्यात आले नाही.

या संकटसमयी नगर पंचायत प्रशासनाने लक्ष देऊन दिव्यांगांना औषध व इतर कामांसाठी निधीची गरज आहे. त्यांच्या बँक खात्यात प्रलंबित निधी ३९०० रुपये लवकरात लवकर जमा करण्यात यावेश अशी मागणी आशिष बारेवार यांनी केली आहे.

# पदविका-प्रमाणपत्रधारक पशुवैद्यकांची पदोन्नती अडचणीत

**गोंदिया:** राज्यातील पदविका-प्रमाणपत्रधारक पशुवैद्यकांना पदोन्नती देताना कोटा निर्धारित करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्ष ही प्रक्रिया राबविताना हा कोटाच रद्द करण्यात आला. यामुळे राज्यभरातील पदविका-प्रमाणपत्रधारक पशुवैद्यकांमध्ये असंतोष पसरला आहे. दरम्यान, १० जूनपर्यंत या संदर्भात योग्य निर्णय झाला नाही तर आंदोलन करण्याचा इशारा पशु चिकित्सा व्यवसायी संघटनेने दिला आहे.

सहायक आयुक्त पशुसंवर्धन व पशुधन विकास अधिकारी (गट-अ) पदाच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा सुरु आहे. यात पदोन्नती देताना पदविका प्रमाणपत्रधारकांचा कोटा अस्तित्वात आहे. त्यामुळे पदाचे सेवा प्रवेश नियम तयार करताना समितीमध्तये संघटनेला स्थान मिळावे, अशी मागणी होती. यासाठी संघटनेसोबत ८ जानेवारीला ऑनलाईन बैठक ठरली होती. मात्र बैठक लांबणीवर पडली. ती अद्याप झाली नसताना दरम्यान पशु संवर्धन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली.

यात पदविका-प्रमाणपत्रधारकांचा पदोन्नती कोटा रद्द करण्यात आला. एवढेच नाही तर पशुधन अधिकारी पदाच्या सुधारित सेवा प्रक्रियेत प्रमाणपत्रधारकांसाठी असलेला १५ टक्के कोटा रद्द करुन औरंगाबाद खंडपीठाच्या निरीक्षणाचा आधार घेत पाच टक्के कोटा पशुधन पर्यवेक्षक संवर्गातील पदविकाधारकांसाठी शिफारस करण्यात आली. ती तरतुद पक्षपाती व अनपेक्षीत असल्याचा संघटनेचा आरोप आहे.

ही प्रक्रिया राबविताना पशुधन विकास अधिकारी (विस्तार) गट-अ पंचायत समिती स्तरावरील पदनामात बदल करुन तालुका पशुसंवर्धन अधिकारी करण्याचा घाट घालण्यात आल्याचा संघटनेचा आरोप आहे. ही पदे अतांत्रिक असल्याने राज्यातील ३५७ तालुकास्तरावरील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) ही पदे पशुधन विकास अधिकारी गट-ब साठी निश्चित आहे. संघटनेच्या विरोधामुळे याला स्थगिती देण्यात आली होती. ती उठविण्यात यावी, अशीही मागणी आहे. यासोबतच वेतनस्तर सुधारणा, प्रवास भत्ता अशा अनेक मागण्यांचा यात समावेश आहे.

# वसुंधरेला वृक्षारोपणाने शृंगारिक करूया-चंद्रिकापुरे



**अर्जुनी मोरगाव** :- संपूर्ण जग एका छोट्याश्या विषाणूमुळे थांबले. रुग्णालयात प्राणवायूची गरज भासली. मोठ्या खर्चाने ते विकत घ्यावे लागले. परंतु वृक्ष आपणास मोफत प्राणवायू देतो त्यासाठी वारेमाप होणारी वृक्ष तोड थांबवून शासनाच्या माझी वसुंधरा या उपक्रमाअंतर्गत प्रत्येकाने झाडे लावून ती जगविली पाहिजे. मानवाच्या जन्मापासून मरणापर्यत झाडे देण्याचीच भावना ठेवतात. घरदार, बगीचा असो की परिसर वृक्ष वेली शिवाय शोभत नाही. पुन्हा शृंगारित करण्यासाठी प्रत्येकानी घरी, शेतात जिथे जमेल तिथे झाडे लावण्याचे आवाहन आ. मनोहर चांद्रिकापुरे यांनी केले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती अर्जुनी मोरगाव येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त तसेच महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा या उपक्रमअंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. चांद्रिकपुरे, सौ. मंजुषा चंद्रिकापुरे, मुख्य प्रशासक लोकपाल गहाने, प्रशासक उध्दव मेहेंदळे, सहकार अधिकारी पी.पी. गाडे, सचिव संजय सिंगणजुडे, आर.के. जांभूळकर, अजय शहारे, देवानंद नंदेश्वर, प्रशांत डोंगरे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना चंद्रिकपुरे म्हणालेत की जगतगुरु तुकाराम महाराज म्हणतात की वृक्षवल्ली आम्हा सोयरे हा ध्यास प्रत्येकानी घेतला पाहिजे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शेतावर. रस्त्याच्या कडेला, घराच्या आवारात कीवा जिथे जमेल तिथे झाडे लावण्याचे काम केले पाहिजे. तालुका कृषी अधिकारी मार्फत फळबाग लागवड योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे

जागतिक तज्ज्ञांच्या अभ्यासानुसार तापमान वाढ चिंतनीय बाब ठरली असून त्याला वारेमाप होणारी वृक्ष तोड ही सुध्दा कारणीभूत ठरली आहे. जंगल व्याप्त क्षेत्र कमी झाले आहे. मानवाचे जंगली भागात शिरकाव होत असल्याने मानवावर जंगली पशुचे होत असलेले आक्रमण चिंतनीय बाब ठरली आहे. हे कुठं तरी थांबविणे गरजेचे आहे. पूर्वीचे धरणी मातेचे ऐश्वर्य पुन्हा प्राप्त करुन देणे ही आता प्रत्येकाची जबाबदारी ठरली आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी सर्वांनी झाडे लावण्याचे एवढेच नव्हे तर आपल्या पोटच्या गोळ्या प्रमाणे त्याचे संगोपन करणे काळाची गरज भासली असून आपला वाढदिवस, घरी जन्मलेल्या बाळाच्या दिवशी, किंवा ईतर वेळी झाडे विशेषतः देशी झाडे लावण्याचे पुण्याचे शुभ कार्य प्रत्येकाचे हातून घडलेच पाहिजे. शेजारील रोपवाटिकेतून मिळणारे रोप आता भेट वस्तू म्हणून स्वीकारण्याची प्रथा सुरु करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंगेश डोये, आनंद गणवीर, कालिदास मेश्राम, धम्मदिप मेश्राम, कालिदास सोनवणे , अशोक जुगादे, दिलीप मेंढे, कवळू शहारे, घनश्याम मस्के व इतरांनी सहकार्य केले.

# मान्सून पुर्व तयारीचे सुक्ष्म नियोजन करावे:जिल्हाधिकारी खवले

## ● जिल्ह्यातील ९६ गावांना पुराचा धोका
## ● शोध बचाव दलातील सदस्यांना SDRF कडून प्रात्यक्षिक



**गोंदिया :** मान्सून कालावधीत जिल्हयातील ९६ पुर प्रवण गावांना पुराचा धोका आहे. मागील वषी २०२० मध्ये आलेल्या पुराची पुनरावृत्ती होऊ नये. तसेच धरण, जलाशय इत्यादी ठिकाणी यावर्षी पाण्याचा साठा जास्त असल्यामुळे सर्व संबंधित विभागांनी मान्सून पुर्व तयारीचे सुक्ष्म नियोजन करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर यांच्यामार्फत आयोजित प्रात्यक्षित कार्यक्रमात केले. सदर कार्यक्रम कटंगी जलाशय गोरेगाव येथे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, गोरेगाव तहसिलदार सचिन गोसावी, SDRF नागपूरचे पोलीस उप अधीक्षक सुरेश कराळे, पोलीस उप निरिक्षक अजय काळसर्पे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, सहायक पोलीस निरीक्षक अरविंद राऊत, जिल्हा शोध व बचाव पथक प्रमुख किशोर टेंभुर्णे, नायब तहसिलदार नरेश वेदी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्रात्यक्षिक कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्री खवले म्हणाले, जलसंपदा व महसुल खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांनी समन्वय ठेऊन कार्य करणे गरजेचे आहे. तसेच धरणाच्या पाण्याचे योग्य नियोजन करुन गावातील नागरिकांना पूर्व सूचना देऊन पाणी सोडून नदीच्या पातळीची सूचना संबंधित विभागांनी देणे आवश्यक आहे. अचानक उदभवणाऱ्या आपत्तीच्या परिस्थीतीला आटोक्यात आणण्यासाठी प्रत्येक विभागाने सतर्क रहावे अशा सूचना जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी सर्व उपस्थितांना दिले.

जिल्हयात सरासरी १३२७.४९ मि.मी पाऊस पडतो. तसेच गोंदिया जिल्हयाच्या बाजूला मध्यप्रदेश आणि छत्तीसगढच्या सीमा लागून आहे. बालाघाट आणि राजनांदगाव जिल्हयात पडणारा पाऊस संजय सरोवर तथा शिरपूर धरणाच्या माध्यमातून जिल्हयात प्रवेश करतो. तसेच संजय सरोवर (मध्यप्रदेश) येथून सुटणारा विसर्गाचा पाणी २५ तासात वैनगांगा नदीच्या माध्यमातून बिरसोला संगम घाट (काटी) महाराष्ट्र येथे पोहोचतो. तसेच शिरपूर देवरी येथून सुटणारा विसर्गाचा पाणी २७ तासात बाघनदीच्या माध्यमातून रजेगांव घाट पर्यत पोहोचतो. या दरम्यान धरणातून सोडलेल्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याची सूचना जिल्हाधिकारी खवले यांनी दिली.

पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी जिल्हा शोध व बचाव दलातील सदस्यांना प्रात्यक्षिकाचे लाभ घेवून पुर परिस्थितीवर मात करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक विभाग प्रमुखांनी २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत ठेवावे. तसेच वाट्सअप ग्रुप तयार करुन पूरपरिस्थतीच्या सूचना नागरीकांना देणे. पूर परिस्थीतीच्या वेळेस टाकाऊ वस्तुंचा प्रयोग करुन आपत्तीवर मात करण्यासाठी जनजागृती करावी असे ते म्हणाले. आपत्तीचे पूर्व नियोजन महत्वाचे असून जिल्हयातील ९६ गावांमध्ये पूर परिस्थितीचे संभाव्य धोके आहेत. मान्सून कालावधीत या गावांमध्ये उपाययोजना करणेसंबंधी पोलीस दल सज्ज असून २४ तास कार्यरत आहे, अशी माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

पोलीस उप अधीक्षक सुरेश कराळे यांनी उपस्थितांना प्रात्यक्षिकाची माहिती देऊन घरगुती टाकाऊ वस्तुपासून तयार करण्यात आलेल्या साहित्यांपासून फ्लोटींग डिवाईस तयार करुन पाण्यात त्यांचे प्रयोग दाखविले. रंगीत तालिमेकरिता गोरेगाव तालुक्यातील कटंगी जलाशय येथे सर्व प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. पाण्यात रबर बोट व इंजिनचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. शोध व बचाव करतांना पाण्यात बुडालेल्या व्यतिचे शोध कार्य, पाण्याच्या प्रवाहात बोटीचे प्रयोग इत्यादीबाबत प्रात्यक्षिकाद्वारे प्रयोग करुन दाखविण्यात आले.

कार्यक्रमास यादव फरकुंडे, इंद्रकुमार बिसेन, चुन्नीलाल मटकुरे, चिंतामन गिन्हेपुंजे, गिरधारीलाल पतैहे, जबराम चिखलोंडे, जितेन्द्र गौर, नरेश उके, राजकुमार बोपचे, जसवंत राहांगडाले, रवि भांडारकर, संदिप कराळे, दिनूदिप, राजकुमार खोटेले, सुरेश पटले, राजेंद्र अंबादे, शर्मानंद शहारे, गजेन्द्र पटले, मुकेश ठाकरे, समित बिसेन, राजेन्द्र शेंडे, अंश चौरसिया, विशाल फुंडे, राहुल मेश्राम, शहबाज सैय्यद, सुमित बिसेन, आदित्य भाजीपाले, अरविंद बिलोन, अजय राहांगडाले, विकास बिजेवार, मंडळ अधिकारी बी.एन.वरखडे, डी.एम.मेश्राम, कटंगी सरपंच तेजेन्द्र हरिणखेडे, अंबादे, बांते, कावडे, गायधने तसेच डख्र्क्र व डछ्रक्र चे अधिकारी-कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेट्रोल व डिझेलच्या दरवाढीविरोधात काँग्रेसची निर्दशने



**गोंदिया:** महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे निर्देशानुसार, केंद्रातील मोदी सरकारने पेट्रोल आणि डिझेल दरांमध्ये केलेल्या अवास्तव दरवाढीचा निषेध करण्याकरिता संपूर्ण राज्यात सोमवारी काँग्रेसच्या वतीने राज्यात विविध ठिकाणी पेट्रोलपंपावर आंदोलन करुन निषेध नोंदवण्यात आला.

गोंदिया येथे जिल्हा काँग्रेसच्यावतीने आंदोलन करण्यात आले.जिल्हाध्यक्ष नामदेवराव किरसान,अशोक गुप्ता,जितेश राणे,राजु काळे,योगेश अग्रवाल,जहीर अहमद,पप्पू पटले,जिवन शरणागत,परवेज बेग,विजय बोरांडे आदी काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. गोरेगाव येथे तालुका काँग्रेस अध्यक्ष डेमेंद्र रहांगडाले,मलेश्याम येरोला यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी पेट्रोलपंपावर आंदोलन केले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या निर्देशानुसार व जिल्हा काँग्रेस कमेटी यांच्या मार्गदर्शनानुसार देवरी व आमगाव येथे ७ जुन रोजी देवरी तालुका व आमगाव तालुका काँग्रेस कमेटीच्या वतीने पेट्रोल, डीजल व गँस दरवाढीवर केंद्र सरकारच्या विरोधात निर्दशने करण्यात आले.

आमगाव/देवरी विधानसभेचे आ. सहसरामभाऊ कोरोटे यांच्या नेतृत्वात देवरी येथे मोदी पेट्रोल पंपावर व आमगावं येथे असाटी पेट्रोल पंपा समोर निर्दशने करण्यात आले. उपविभागीय अधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. या प्रसंगी दोन्ही ठिकाणी मोठ्या संख्येत कार्यकर्ते उपस्थित होते. यात देवरी



तालुका काँग्रेस अध्यक्ष संदिप भाटिया, आमगाव तालुका अध्यक्ष संजय डोये, जिल्हा महीला काँग्रेस अध्यक्ष उषा शहारे, माजी तालुकाध्यक्ष राध्येशाम बगडीया, माजी नगर सेवक ओमप्रकाश रामटेके,तालुका महासचीव बळीराम कोटवार, युवक कांग्रेस चे तालुका अध्यक्ष शकील कुरेशी, शहर अध्यक्ष कुलदिप गुप्ता, अविनाश टेभंरे, रोशन भाटीया, राजा कोरोटे, शारदुल संगीडवार, राजेश गाहाने, सुरेन्द्र बन्सोड, जयपाल प्रधान, कमलेश पालीवाल, कलीराम कीरसान,पवन कोटवार सहभागी झाले होते. तर आमगाव येथे तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष छबूताई उके, ईसुलाल भालेकर, जिल्हा ओबीसी आघाडीचे उपाध्यक्ष जगदीश चूटे, महेश उके, शहर काँग्रेस अध्यक्ष अजय खेतान, गणेश हुकरे, भुमेश्वर मेंढे, नंदू कोरे, रामदास गायधने, नरेन्द्र बागडे, श्याम देशमुख, नरेश बोपचे, प्रदीप खोटोले, यादवराव भोयर, इंदल पातोडे, भुमेश्वर फुंडे, प्रभाताई उपराडे, सुषमाताई बोपचे आदी उपस्थीत होते.

# वनांतील जलस्त्रोत कोरडे, वन्यप्राण्यांची गावाकडे धाव

**सडक अर्जुनी:** वाढत्या तापमानाने वनांतील पाण्याचे स्त्रोत कोरडे पडले आहेत. परिणी पाण्याच्या शोधात वन्यप्राणी मानवी वसतीकडे धाव घेत असल्याचे चित्र आहे. तापमानात वाढ झाल्याने त्याचा परिणाम सिंचन प्रकल्पातील पाणीसाठ्यावर होत आहे. नदी, नाले, तलाव, बोड्या कोरडे पडल्याने मानवासह वन्यप्रण्यांची पाण्याच्या शोधात भटकंती सुरू आहे. जंगलातील पाणवठे देखील कोरडे पडले आहेत. वाढते तापमान व पाण्याअभावी वन्यप्रण्यांचा मृत्यू होत आहे. तालुक्यात वशीकरण पहाडी परिसरात नुकताच असा प्रकार उघडकीस आला आहे.

गोंदिया जिल्हा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील अनेक सिंचन प्रकल्प आणि तलाव कोरडे पडले आहेत. परिणामी तलावांच्या जिल्ह्यात मे महिन्यात पाण्याचा ठणठणाट निर्माण झाल्याने पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. तापमानात वाढ झाल्याने त्याचा परिणाम सिंचन प्रकल्पातील पाणीसाठ्यावर दिसून आला. धान व अन्य पिकांना सिंचनासाठी होत असलेला पाण्याचा वापर यामुळेही पाण्याची स्त्रोते आता कोरडी पडली आहेत. वनांतील पाण्याचे स्त्रोत आटल्याने वन्यप्रण्यांना पाण्यासाठी गावाकडे धाव घ्यावी



लागत आहे. पाण्याअभावी व उष्णतेच्या दाहकतेमुळे रानगव्याचा मृत्यू झाला आहे. यामुळे वन आणि वन्यजीव विभागाचे उपाययोजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नवेगाव-नागझिरा अभयारण्य व व्याघ्र प्रकल्पात २५६ पाण-वठे असून त्यापैकी ७८ नैसर्गिक स्त्रोतांचे तर १५४ कृत्रिम पाणवठे आहेत. २४ तलावही या क्षेत्रात आहेत.१५४ कृत्रिम पाणवठ्यात पाणीपुरवठा व्हावा यासाठी १४९ हातपंप तयार केले आहेत. त्यापैकी ११० हातपंप सौरऊर्जेवर चालणारे आहेत. १३ पाणवड्यात ३ टँकरच्या साहाय्याने पाण्याची सोय केली जात आहे. वन्यप्राण्यांना पाण्यासाठी भटकावे लागत नसल्याचे वन्यजीव विभागाचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. वन्यप्रेमींनी जंगलातील कुठल्याच पाणवठ्यात पाण्याची सोय करण्यात आली नसल्याचा आरोप केला आहे. काही निसर्ग प्रेमी संस्थांनी आवाज उठविल्यानंतर वन्यजीव विभागाने टँकर लावून पाण्याची सोय केल्याची माहिती दिली.

नवेगाव-नागझिरा अभयारण्यातील पुनर्वसीत थाडेझरी गावाजवळील तलाव पूर्णतः कोरडा पडला आहे. थाडेझरीपासून नागझिरा अभयारण्य ७ किमी अंतरावर आहे. सन १९९८ पासून थाडेझरी येथील तलावाचे वन्यजीव विभागाने खोलीकरण केले नाही. मार्च-एप्रिल महिन्यातच तलाव कोरडा पडतो. त्यामुळे पाण्याच्या शोधात वन्यप्राणी गावाकडे धाव घेत आहे. हीच बाब हेरून शिकारी वन्यप्राण्यांची शिकार करतात. उल्लेखनिय म्हणजे कोट्यवधी रुपये वन्यप्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्यावरील उपाययोजनेवर खर्च केले जातात. मात्र उपाययोजना शोधूनही सापडत नाही.

# महाराष्ट्र एक्सप्रेसचा विस्तार गोंदियाकरांच्या जिव्हारी

**गोंदिया:** गोंदिया ते कोल्हापुर दरम्यान, धावणारी राजश्री शाहू महाराज कोल्हापुर गोंदिया महाराष्ट्र एक्सप्रेस या रेल्वेगाडीचा विस्तार रिवा रेल्वेस्थानकापर्यंत करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाकडून घेण्यात आला आहे. रेल्वेचा हा निर्णय गोंदियाकरांच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. महाराष्ट्र एक्सप्रेस या रेल्वेगाडीचा विस्तार करण्यात आल्याचा संदेश सोशल मिडीयावर वायरल झाला असून रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाने प्रवाशांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.

राज्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत म्हणजेच कोल्हापूर ते गोंदियापर्यंत महाराष्ट्र एक्सप्रेस धावत असून टाळेबंदीपुर्वी दरदिवशी सकाळी ८.१० वाजता ही रेल्वेगाडी गोंदिया रेल्वेस्थानकावर प्रस्थान करीत होती. तर सकाळी ११ वाजताच्या नागपूर रेल्वेस्थानक गाठायची त्यामुळे अनेक विद्यार्थी, दैनंदिन कामावर जाणारा




**नवीन रेल्वेगाडी सुरु करावी**

**महाराष्ट्र एक्सप्रेस गोंदिया ते नागपूरपर्यंतच्या रेल्वे प्रवाशांसाठी जीवनदायनीच अशीच असून या रेल्वेगाडीमध्ये विस्तार करण्यात आल्याने प्रवाशांची चांगलीच दमछाक होईल. तेव्हा महाराष्ट्र एक्सप्रेसमध्ये विस्तार न करता रिवा करीता नवीन रेल्वेगाडी सुरु करण्यात यावी. तर या विषयी आपण रेल्वे प्रशासनाशी चर्चा करणार आहे.**

**सुनील मेंढे खासदार,भंडारा-गोंदिया लोकसभा**

मजूरवर्ग, शासकीय नीमशासकीय नोकरदार यांच्यासह व्यापारी व दुध विक्रेत्यांसाठी ही रेल्वेगाडी जीवनदायनीच ठरली आहे. गोंदिया ते नागपूरदरम्यान गोंदिया, तिरोडा, तुमसर रोड, भंडारा रोड, कामठी, इतवारी या स्थानकावरुन दरदिवशी हजारो प्रवासी या रेल्वेगाडीने प्रवास करतात. विशेष म्हणजे गोंदिया स्थानकावरुन ही रेल्वेगाडी असल्याने गोंदियाकरांसाठी सोयीस्कर आहे. मात्र, आता या रेल्वेगाडी विस्तार किंवा रेल्वेस्थानकापर्यंत करण्यात आल्याची माहिती सोशल मिडीयावर वायरल झाली असून तसे रेल्वेचे वेळापत्रकही आहे. त्यात वेळेत बदल झाले नसले तरी पुढील स्थानकापासूनच प्रवाशांची गर्दी राहणार असल्याने नागरिकांमध्ये रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाने नार-ाजीचे सुर उमटू लागले आहे.

# ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी प्रयत्न करावे-ओबीसी शिष्टमंडळाची पटोलेंशी चर्चा



**सावली:-** स्थानिक स्वराज्य संस्थांमधील धोक्यात आलेले ओबीसीचे राजकीय आरक्षण अबाधित ठेवण्यासाठी राज्यसरकारने कोर्टाच्या निर्णयानुसार कार्यवाही करावी.इतर मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करावी आणि ओबीसींची जातनिहाय जनगणना करावी इत्यादी मागण्यासंदर्भात ओबीसी शिष्टमंडळाने काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांना निवेदन देऊन त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी राज्याचे ओबीसी, बहुजन कल्याण मंत्री आमदार विजय वडेट्टीवार उपस्थित होते.

यावर पटोले यांनी मागण्या रास्त असून त्या मागी लावल्या जातील असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले. शिष्टमंडळात राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे तालुका अध्यक्ष कविंद्र रोहनकर, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष अविनाश पाल, दिवाकर गेडाम, गिरीश चीमुरकर, किशोर घोटेकर, दीपक जवादे , मनिषाताई जव-ादे, सूनिताताई उरकुडे निखील सुरमवार, कुनघाडकर सर, सुनील पाल, विनोद रोहनकर, हिवराज शेरकी, केशव भरडकर तुळशीदास भुरसे, आशिष मनबतुनवार, नितीन गोहणे , गुरुदेव भूरसे, अरविंद निकेसर, अविनाश भुरसे, आदी ओबीसी बाधव उपस्थित होते.

# कोरोना संकटात सापडलेल्या कुटूंबांना मदत करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**गोंदिया :** कोविड-१९ च्या महासंकटामुळे गोंदिया जिल्ह्यात आतापर्यंत ६९३ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झालेला आहे. जिल्हा प्रशासनाद्वारे सातत्याने कोरोना संकटात सापडलेल्या कुटूंबांना भेट देण्यात येत असून त्यांचे मनोबल

वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे. यातील काही कुटूंबे हे अत्यंत अडचणीत आहेत. घरातील कमावत्या पुरुषाचा मृत्यू झालेला आहे, असे देखील अनेक प्रकरणांमध्ये घडलेले आहे. शासनाच्या वतीने ज्या योजनांचा लाभ या कुटूंबांना देता येईल त्याकरीता गोंदिया जिल्हा प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी तसेच सामाजिक संघटना यांना आवाहन करण्यात येते की, संकटामध्ये सापडलेल्या या कुटूंबांना आपण कशाप्रकारे मदत करु शकतो याचा आपण विचार करुन आपल्या स्तरावरुन त्यांना जी मदत करता येईल ती मदत करावी. किमान अशा कुटूंबांना भेट देवून त्यांचे मनोबल उंचावण्याचा प्रयत्न करावा. असे आवाहन जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी केले आहे

# कोरोनामुळे कर्ता व्यक्ती गमावलेल्या कुटुंबांना जिल्हाधिकाऱ्यांची सांत्वना भेट



**गोंदिया :** गोंदिया तालुक्यात कोरोनामुळे कुटुंबातील प्रमुख व्यक्ती मृत्यू पावलेल्या कुटुंबातील सदस्यांची जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी प्रशासनाच्या वतीने सांत्वनपर भेट घेऊन कुटुंबियांना मानसिक आधार दिला. कोरोना झाल्यामुळे परिवारातील प्रमुख कमावता व्यक्ती गमावल्यामुळे तसेच या भीतीपोटी सामाजिक भीती निर्माण होऊन संबंधित परिवाराचे मानसिक खच्चीकरण झालेले असल्यामुळे प्रशासनातर्फे सदर परिवारांची भेट घेण्यात आली. यामुळे अशा परिवारांना मानसिक आधार मिळून इतर नागरिकांच्या मनात असलेली भीतीदेखील घालवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अशा परिस्थितीमध्ये कर्ता पुरुष गमावलेल्या परिवारातील त्यांच्या विधवा पत्नीस विशेष सहाय्य योजने अंतर्गत तात्काळ लाभ मिळवून देण्याबाबत अधिकारी कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असून शासनाच्या विविध निकषांच्या अनुषंगाने देखील संबंधित परिवारास लाभ देण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

सदर भेटीदरम्यान संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये शिवराज्याभिषेक दिनाच्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संबंधित ग्रामपंचायत पदाधिकारी यांना त्यांच्या गावात कोरोनाचा प्रसार कसा थांबवण्यात यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात येऊन शंभर टक्के नागरिकांचे लसीकरण करण्याबाबत आवाहन करण्यात आले. सदर भेटीदरम्यान तहसीलदार आदेश डफळ, अप्पर तहसीलदार अनिल खडतकर, मंडळ अधिकारी एन.बी. वर्मा, अव्वल कारकून आशिष रामटेके व महसूल सहाय्यक मुकुंद तिवारी हे प्रामुख्याने उपस्थित होते.

## रेल्वेची ई-तिकीट बनवून विक्री करणाऱ्या दलालास अटक

**गोंदिया :** गोंदिया रेल्वे अंतर्गत अवैधरित्या ई-तिकीट बनवून विक्री करणा?या गोंदिया ग्रामीणमधील रहिवासी ३२ वर्षीय आरोपीला रेल्वे सुरक्षा दलाच्या क्राइम ब्रांचने अटक केली. त्याच्या जवळून ११ हजार ५३२ रुपयांच्या १६ ई-तिकीट जप्त करण्यात आल्या. सध्या कोरोना परिस्थितीमुळे रेल्वे तिकिटांची मोठी किल्लत निर्माण झाली आहे. अशात रेल्वेच्या अवैध तिकिटा बनवून विक्री करणारे दलाल सक्रिय झाले आहेत. असाच रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या तिकिटा अवैधरित्या बनवून अधिक नफा कमविण्याचे कार्य करणारा गोंदिया ग्रामीणमधील रहिवासी ३२ वर्षीय आरोपीची गोपनीय माहिती रेल्वे सुरक्षा दलाच्या क्राइम ब्रांचचे निरीक्षक अनिल पाटील यांना मिळाली. त्यांनी खात्री करून ते सोबत उपनिरीक्षक के.के. दुबे, मुख्य आरक्षक आर.सी. कटरे, आरक्षक एस.बी. मेश्राम यांच्या सोबत घटनास्थळी धाड घातली. आरोपीने आपल्या पर्सनल आयडीने रेल्वेच्या १६ आरक्षित तिकिटा तयार केल्या होत्या. त्यांची किंमत ११ हजार ५३२ रुपये सांगण्यात आली. आरोपीविरुद्ध रेल्वे अर्धीनियमच्या कलम १४३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# शेतकऱ्यांच्या अडचणी आपण सोडविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करू- खा.पटेल




**देवरी:** तालुक्यातील कार्यकर्ता व पदाधिकारी बैठक सिताराम लान देवरी येथे खासदार प्रफुल पटेल यांच्या उपस्थीतीत पार पडली. याप्रसंगी तालुक्यातील पदाधिकारी व नागरिकांसोबत विविध समस्यावर चर्चा केली. परिसरातील शेतकऱ्यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करू शेतकऱ्यांचा मालाच्या भावाचा प्रश्न किंवा बोनसचा प्रश्नन असो आपण प्रामाणिक पणे सोडविले आहे. आणि आणखी शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत त्यासाठी सुद्धा आपण प्रयत्न करणार आहोत, तसेच वरिष्ठ पदाधिकार्यानी जनतेचे कामे सोडविण्यासाठी प्रामाणिक पणे काम करावे, पक्ष संघटन मजबूत करून, येणाऱ्या काळातील निवडणुका आपण नक्की जिंकू असा विश्वास त्यांही कार्यकर्त्यांना संबोधून व्यक्त केला. परिसरातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्हा पणन अधिकारी यांच्याशी फोन वर चर्चा करून समस्या निकाली काढण्याचे निर्देश श्री पटेल यांनी दिले.

या बैठकी दरम्यान श्री पटेल यांच्या सोबत सर्वश्री राजेंद्र जैन, विजय शिवनकर, नरेश माहेश्वरी, सौ.दुर्गा तिराले, रमेश ताराम, सी. के. बिसेन, गोपाल तिराले, यो-गेश देशमुख, मुकेश खरोले, हिमांशू ताराम, मुन्नाजी अन्सारी, युगेश बिसेन, चंचल जैन, गोपाल तिवारी, दिलीप दुगकर, भास्कर धर्मसहारे, मोंटीजी अन्सारी, बबलू खान, राजेश बिनझलेकर, भैय्यालाल चांदेवार, इंदल अरकरा, मनोहर राऊत, सत्यवान देशमुख, दीपेश टेभरें, सारंग देशपांडे, सुजित अग्रवाल, घनश्याम बावनथडे, सौ.सुमनताई बिसेन, सौ.अर्चना ताराम, सौ.पार्बताताई चांदेवार, सौ.मंजुषा वासनिक, सौ.शर्मिला टेम्भूरकर, पुष्पा मस्के, विलास चाकोते, हेमंत ताराम, माधुरी सहारे, आरती जांगडे, पंकज सहारे, धनराज बावणथडे, प्रल्हाद भोयर, अनिल धोटे, महादेव श्याम कुवर, महेंद्र विकोडे वसंत देशमुख, पूणाराम तुलावी, सतीश बिसेन, रवींद्र मेश्राम, रंजन मेश्राम अन्य कार्यकर्ता पदाधिकारी उपस्थित होते.

# साहेब...राजाभोज कॉलनीकडे लक्ष देणार का?

## कॉलनीत समस्यांचा डोंगर, आता नगराध्यक्षांकडे धाव



### पावसाळ्यात ये-जा कसे करणार?

**गोंदिया-तिरोडा मार्गावरून राजाभोज कॉलनीकडे जाण्याकरिता एकच मुख्य मार्ग आहे. मात्र, या रस्त्याची दयनिय अवस्था झाली आहे. जागो-जागी खड्डे पडले असून रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे आहेत. पाऊस आला की रस्ता चिखलमय होतो. सध्या पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यात रस्त्यावर तीन फुट पाणी साचून राहतो. त्यामुळे पावसाळ्यात आम्ही ये-जा कसे करणार? असा प्रश्न कॉलनीवासीयांनी पडला आहे.**

**गोंदिया:** जवळील भगतसिंह वॉर्ड, राजाभोज कॉलनीत रस्ते, नाली, पिण्याचे पाणी, विद्युत ट्रान्सफार्मर अशा विविध समस्या आहेत. या समस्या सोडविण्यासाठी अनेकदा लोकप्रतिनिधींना निवेदन दिले. मात्र, अद्याप त्यांच्या समस्यांकडे लक्ष देण्यात आले नाही. साहेब... आमच्या कॉलनीकडे लक्ष देणार का? असा सवाल कॉलनीवासी उपस्थित करीत आहेत. तर आता समस्या सोडविण्यासाठी त्यांनी नगराध्यक्ष अशोक इंगळे यांच्याकडे धाव घेतली असून त्यांना मागण्यांचे निवेदन दिले आहे. त्वरित या समस्या मार्गी न लागल्यास आंदोलन करणार, असा इशाराही कॉलनीवासीयांनी दिला आहे.

शहीद भगतसिंह वॉर्ड, राजाभोज कॉलनीमध्ये जवळपास ३०० ते ४०० घरांची वसाहत आहे. तसेच १०० च्यावर नवीन घरांचे बांधकाम सुरू आहे. एवढ्या मोठ्या कॉलनीत विद्युत विभागाचा एकच ट्रान्सफार्मर आहे. परिणामी, विद्युत दाब कमी होण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. भर उन्हाळ्यात कुलर, पंखे, घरगुती बोअरवेल काम करत नाही. त्यामुळे पाण्याची समस्या उद्बवली आहे. गोंदिया-तिरोडा मुख्य मार्गावरून राजाभोज कॉलनीत जाण्याकरिता एकच मार्ग आहे. या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडल्यामुळे नागरिकांना ये-जा करण्यास कसरत करावी लागत आहे. असेच कॉलनी परिसरात अनेक रस्ते असून नागरिकांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. या रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्यात यावे.

कॉलनी परिसरात नाल्या नसल्यामुळे सांडपाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे परिसरात दुर्गंधही पसरत आहे. तसेच कॉलनी बाहेर ये-जा करण्यासाठी एकमेव अरूंद पूल असून त्याची अवस्था जीर्ण झाली आहे. या पुलावरून ये-जा करणे धोक्याचे झाले असून या पुलाचे त्वरित नव्याने बांधकाम करण्यात यावे, अशा विविध मागण्यांचे निवेदन कॉलनीवासीयांनी आमदार, नगरसेवक, नगराध्यक्ष व संबंधित विभागाला वारंवार दिले. मात्र, त्यांच्या समस्यांची दखल अद्याप घेण्यात आली नाही. त्यामुळे साहेब आता तरी आमच्या कॉलनीकडे लक्ष देणार का? असा सवाल कॉलनीवासीयांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, राजाभोज कॉलनीवासीयांनी पुन्हा ६ जून रोजी नगराध्यक्ष अशोक इंगळे यांना निवेदन देऊन कॉलनीतील समस्या त्वरित सोडविण्यात यावे, अशी मागणी केली. जर या समस्या त्वरित मार्गी लागणार नाही तर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही कॉलनीवासीयांनी दिला आहे. निवेदन देतेवेळी लोकचंद बिसेन, अशोक टयीकर, गणेश बिसेन, महेंद्र ठाकरे, प्रविण मुजारिया, दिनेश रहांगडाले, राजीव ठकरेले, तिरथ तिलगाम, अमीत मंडल, रोशन भानारकर आदी उपस्थित होते.



# ७ गटशिक्षणाधिकाऱ्यांचे पद रिक्त

**गोंदिया:** तालुका स्तरावरील शाळा तसेच शिक्षकांवर नियंत्रण ठेवण्यासाची जवाबदारी असलेल्या गटशिक्षणाधिकाऱ्यांचे जिल्ह्यात ८ पैकी तब्बल ७ पदे रिक्त असल्याने शिक्षण विभाग प्रभारींच्या भरोवश्यावर कारभार हाकत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक कामे खोळंबली असून प्रशासन चालवायचे तरी कसे, असा प्रश्न अधिकाऱ्यांना पडला आहे.

गोंदिया जिल्ह्यात ८ तालुके आहे. तालुकानिहाय एक प्रमाणे जिल्ह्यात ८ गटशिक्षणाधिकारी असणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे ८ ही पदे मंजूर आहे. मात्र सडक अर्जुनी तालुका वगळता एकाही तालुक्यात गटशिक्षणाधिकारीच नसल्याचे समोर आले असून त्यांचा प्रभार शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. दोन-दोन पदे सांभाळतांना शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या नाकी दम येत आहे. मात्र वरिष्ठांनी दिलेली जवाबदारी कशी तरी पेलायची. त्यामुळे ते मुकाट्याने त्रास सहन करीत आहेत. विशेष म्हणजे गोरेगाव तालुक्यात गटशिक्षणाधिकाऱ्यांचा पदभार शालेय पोषण आहार अधिकाऱ्यांकडे आहे.

गट शिक्षणाधिकाऱ्यांचा प्रभार सोपविताना संबंधित अधिकारी बीएड असणे गरजेचे आहे. मात्र याकडे दुर्लक्ष करुन पदभार सोपवून काम करवून घेतल्या जात आहे. यामुळे शैक्षणिक कामे मागे पडत असून त्याचा शिक्षण विभागावर विपरित परिणाम होत आहे. विशेष म्हणजे काही दिवसांत शाळा सुरु होणार असून शाळा, पटसंख्या, पुस्तक, गणवेश वितरण आदि शैक्षणिक कामे वाढणार आहे. इंग्रजी शाळांच्या तुलनेत मराठी शाळा मागे पडत असल्याची ओरड सातत्याने होत आहे. अनेकदा या शाळा बंद पडतात की काय अशीही भीती व्यक्त केली जात आहे. असे असतानाच शिक्षण विभागाचा कणा असलेल्या गटशिक्षणाधिकाऱ्यांचे ७ पद रिक्त ठेवण्यामागे नेमका उद्देश काय, हे मात्र कळायला मार्ग नाही.



**शिक्षणाधिकारी प्रभारी, उपशिक्षणाधिकाऱ्यांची पदे रिक्त**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी हे पद गेल्या दोन वर्षांपासून रिक्त आहे. या पदाचा प्रभार डायटचे प्राध्यापक राजकुमार हिवारे यांच्याकडे आहे. प्रभार हा काही कालावधीकरिता असतो. मात्र, तब्बल दोन वर्षांचा काळ लोटत असताना देखील तेच या पदावर आहेत. शिक्षण विभागात तीन उपशिक्षणाधिकारींची पदे मान्य आहेत. मात्र आजघडीला तीनही पदे रिक्त असल्याने शिक्षणाचा पुरता बोजवारा उडाला आहे.

**सुविधा उपलब्ध, देखरेख नाही**

जिल्हा परिषदेच्या बहुतांश शाळांमध्ये ई-लर्निंग, साऊंड सिस्टीम आदी सुविधा उपलब्ध आहे. मात्र शाळांकडे लक्ष ठेवण्याची जवाबदारी असलेले गटशिषणाधिकारीच नसल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. रिक्त पदांमुळे आलेला दिवस काढण्याचे काम शिक्षण विभागात सध्या सुरु आहे. कोरोनाचे संक्रमण असल्याने तेवढा भार नाही. मात्र नवीन शैक्षणिक सत्र या महिन्यात सुरु होणार असल्याने अशा स्थितीत रिक्त पदांच्या भरवशावर विभागाचा डोलारा सांभाळतांना कमालीची कसरत करावी लागणार आहे.

**वरिष्ठांना डावलून कनिष्ठांकडे प्रभार**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात गेल्या काही वर्षांपासून नवीनच प्रथा सुरु झाली आहे. येथील अधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करीत वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना डावलून थेट कनिष्ठ विस्तार अधिकाऱ्यांना प्रभार सोपवत आहेत. यात मोठे गौडबंगाल असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे.